# प्रकरण तिसरे
## ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे जीवनचरित्र

**३.१ प्रस्तावना**

**३.२ बालपणातील कौटुंबिक स्थिती**

३.२.१ बालपणातील काही आठवणीतील प्रसंग

**३.३ अण्णा हजारे यांचे सैनिकी जीवन**

३.३.१ सैन्यात भरती

३.३.२ मिझोराम मधील प्रसंग

३.३.३ काश्मीरमधील तो दिवस

३.३.४ जवानांच्या हक्कासाठी संघर्ष

३.३.५ कॅप्टनला धडा

३.३.६ आपणही निर्दोष हवे...

३.३.७ जवानांच्या प्रश्नांची दखल

३.३.८ युध्दभूमीवरील प्रसंग

३.३.९ अमरनाथाचे दर्शन

**३.४ आत्मघाताचा विचार आणि समाजसेवेमागील प्रेरणा**

३.४.१ स्वामी विवेकानंदांच्या विचारातून अण्णा हजारे यांच्या जीवनात नवे परिवर्तन

३.४.२ सैनादलातील एका तपाची साधना

**३.५ अण्णा हजारे यांना मिळालेले विविध पुरस्कार**

**३.६ सारांश**

## ३.१ प्रस्तावना :

आजची भारतीय राजकीय व्यवस्था आणि समाजव्यवस्थेचा बारकाईने अभ्यास केला तर असे दिसून येते, या व्यवस्थांमध्ये सातत्याने संघर्षातून परिवर्तन आणि परिवर्तनातून सुधारणा झ ाल्याचे दिसून येते. प्राचीन काळी देवऋषींनी राजकीय व्यवस्था आणि समाजव्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले. मध्ययुगात राजकीय व्यवस्था आणि समाजव्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्यासाठी संतपंरपरेला सुरुवात झाली. आधुनिक कालखंडात अनेक समाजसुधारकांनी समाजव्यवस्था आणि राजकीय व्यवस्थेमध्ये योगदान दिले. उदा. राजाराममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, महात्मा जोतिबा फुले, लोकमान्य टिळक, म. गांधी आदी. थोडक्यात एवढेच म्हणता येईल, भारतीय राजकीय व्यवस्था आणि समाजव्यवस्थेमध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी तत्कालीन परिस्थितीतून नवनवीन समाजसुधारकांचा जन्म झाला. ते सुधारक भारतीय राजकीय व्यवस्था आणि समाजव्यवस्था यांमध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या ध्येयाने भारावलेले होते. मात्र या समाजसुधारकांना खरा संघर्ष ब्रिटिश सत्तेशी आणि जन्माने भारतीय असून सावकारीद्वारे गरीब, निरक्षर रयतेचे शोषण करणाऱ्या सावकारांशी करावा लागला. हा काळ सामान्यपणे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धाचा काळ होता.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात इंग्रजी विद्या घेतलेल्या लोकांच्या पहिल्या व दुसऱ्या पिढीचे बहुतेकजण इंग्रजी राजवटीने दिपून गेले होते. इंग्रजी अमलाखालच्या बंगालमध्ये साठ-

सत्तर वर्षांच्या काळात बलात्कार, जुलूम आणि कुनीतीऐवजी लोक निर्भयपणा आणि स्वातंत्र्य भोगतात हे पाहून महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारक 'दर्पण'कर्ते बाळशास्त्री जांभेकर यांना विस्मय वाटल्याचे त्यांनी म्हटले आहे.[१] इंग्रजी विद्येचा प्रसार झाल्यानंतर मुंबई इलाखाही बंगालप्रमाणेच सुधारेल अशी बाळशास्त्री जांभेकरांची आशा होती. हिंदू लोकांमध्ये मूर्खपणा वाढला, तो दूर होण्याकरिता हे गुरु दूर देशातून इकडे ईश्वराने पाठविले आहेत. इंग्रज लोकांच्या राज्यामुळे हिंदू लोकांमध्ये जागृती आली व पृथ्वीवर काय काय आहे हे कळू लागले. ईश्वराने ही शहाणपणानेच योजना केली आहे. लोकांची झोप जाण्यास दुसरा इलाज नव्हता. असे ४ फेब्रुवारी १८४९ रोजी प्रसिध्द झालेल्या लोकहितवादींच्या पत्रात म्हटले आहे. आपण स्वराज्य गमावले, कारण आपल्याला राज्यकारभार करता येत नाही व आपले राज्य सांभाळण्याची ताकद नाही, असे लोकहितवादींचे म्हणणे होते.[२] आपल्या लोकांच्या रीती बदलण्यापूर्वी आणि त्यांना राज्य चालविण्याचे सामर्थ्य येण्यापूर्वी इंग्रज या देशातून गेले तर पुन्हा गर्दी होईल व बेबंदशाही, अंदाधुंदी, भालेराई, होळकरी गर्दी पुनरपि होईल आणि कोणाचा जीव व घरदारही निर्भय राहणार नाही. जो निर्बल असेल तो उपाशी मरेल.[३] एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात इंग्रजी राजवटीची नवलाई ओसरल्यानंतर गोपाळ गणेश आगरकरांसारखे समाजसुधारक 'इंग्रजी राज्याची उलट बाजू अथवा 'आमचे घोर दारिद्र्य,' 'हिंदुस्थानास क्षय लागला,' 'इंग्लिश राज्यात पोटभर अन्न मिळत नाही.' अशा मथळ्यांचे लेख लिहू लागले; मात्र आपल्या सामाजिक व धार्मिक दु:स्थितीमुळे आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य राखण्यास लागणाऱ्या गुणांचा लोप झाल्याने पेशवाईचा बीमोड झाला असे आगरकरांचेही म्हणणे होते. स्वातंत्र्यरक्षणाचे सामर्थ्य आपल्या अंगी येण्यापूर्वी इंग्रजाचे राज्य नाहीसे झाले तर रशिया आमच्या छातीवर पाय देण्यास तयार आहेच वाटून असे आगरकर, जांभेकर, लोकहितवादी,

रानडे, आगरकर आदींना गेलेले स्वराज्य परत मिळविण्याच्या प्रश्नापेक्षाही स्वराज्य मिळाल्यानंतर ते टिकविण्यासाठी आवश्यक त्या गुणांचा व सुधारणांचा प्रश्न जास्त महत्त्वाचा वाटत होता. आपल्यापेक्षा सर्वच दृष्टींनी वरचढ असलेल्या इंग्रजांच्या सहचर्यामुळे स्वातंत्र्यरक्षणासाठी आवश्यक त्या गुणांची जोपासना आपण करु शकू असा या सर्वांना विश्वास वाटत होता.

महाराष्ट्रातील मुंबई- पुण्याची इंग्रजी शिकलेली मंडळी प्रथम अनिष्ट सामाजिक रुढींविरुध्द प्रचार करु लागली. महाराष्ट्रात सती पध्दतीचे स्तोम बंगाल प्रांताएवढे तीव्र नसले तरी शिवकाळात पेशवाईत सती जाण्याची उदाहरणे होती. ११ सप्टेंबर १८१९ रोजी पुण्यात राधाबाई नावाची स्त्री सती गेल्यानंतर जिल्हाधिकारी रॉबर्टसन याने शास्त्रीपंडितांचे मत अजमावले. तेव्हापासून सती जाणे बंधनकारक नसल्याने सरकारने या प्रकारात जुलूम जबरदस्ती होऊ नये म्हणून लक्ष घालण्यास हरकत नाही, असे अनेक शास्त्रीपंडितानी सांगितले.[४]

विधवांच्या दुर्दशेची जाहीर चर्चा बाळशास्त्री जांभेकरांनी दर्पण पत्रात १८३७ सालच्या ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात टिपणे प्रसिध्द करुन प्रथम सुरु केली. भोपाळचे तेलंगी ब्राह्मण सुबाजी बापू यांनी वयात येण्यापूर्वीच नवऱ्याला पारख्या झालेल्या बालविधवांना पुनर्विवाह करु द्यावा असे प्रतिपादन केले. तेव्हा आपल्या प्रतिपादनाच्या बाजूने सुबाजी बापूंनी एकही शास्त्राधार काढून दाखवला नाही.अशी जांभेकरांनी टीका केली.[५]

बालविवाहाला आळा घालणाऱ्या सुधारकांनाही प्रखर विरोधाला तोंड द्यावे लागले. जरठ बाला विवाहामुळे लहानवयात मुली विधवा होत. विधवा विवाहासाठी चळवळ करणाऱ्यांनी

बालविवाहाविरोधात मोहीम काढणे अपरिहार्य होते. कारण लॉर्ड रिपनने म्हटल्याप्रमाणे बालविवाह व लादलेले वैधव्य या एकाच प्रश्नाच्या दोन बाजू होत्या.[६]

पुनर्विवाहाच्या प्रश्नावर किंवा संमतिवयाच्या विधेयकावर वादळ होण्याच्या आधी महाराष्ट्रातील सुधारकांनी स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी शाळा सुरु केल्या. बोर्ड ऑफ एज्युकेशनचे अध्यक्ष सर अर्स्किन पेरी यांनी या शाळांना आर्थिक साहाय्य केल्याशिवाय जोतीरावांनी अनेक अडचणी सोसून चालविलेल्या सत्कार्याबद्दल यांचा सत्कार करावा अशी सरकारला शिफारस केली.[७]

अशाप्रकारे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या सुरुवातीला भारतीय राजकीय व्यवस्था आणि समाजव्यवस्था यांमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी तत्कालीन समाजसुधारकांनी आणि राज्यसुधारकांनी शर्थीचे प्रयत्न केले. यामध्ये बाबा पदमनजी, कासम महंमद व नारायण रघुनाथ नवलकर आदी परमहंस सभेतील व्यक्तींनी, स्वामी दयानंद सरस्वती, राजा राममोहन रॉय, लोकहितवादी, न्या.रानडे, जोतीराव फुले, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी आदींनी राज्यसुधारणा व समाजसुधारणा कार्यात मोलाचे योगदान दिले.

जगात अनेक माणसे जन्माला येतात तशी काहीजण कर्तृत्व न दाखवता या जगाचा निरोप घेतात. खाणे, पिणे, मौजमजा करणे एवढेच त्यांच्या जीवनाचे ध्येय असते. अशा व्यक्तीच्या जन्म मृत्यूला फारसे महत्त्व नसते. हे संपूर्ण जग मिथ्या आहे. जो कुणी स्वतःसाठी जगेल तो पापाचा भागीदार होईल, जो कुणी लोककल्याणासाठी जगेल त्याचे जगणे अमर होईल. अशी माणसे अखंड काळपर्यंत लोकांच्या स्मरणात राहतात. लोककल्याण हा सर्वांचाच उद्देश ठरतो, असे नाही. जो कुणी यामध्ये

होरपळून निघतो तोच खरा या देशाचा संसार करतो. त्याच्यावरुन जगाची ओळख होते. उदा. महात्मा गांधी, पंडित नेहरु, नेल्सन मंडेला आदी.

भारत हा खंडप्राय देश आहे. या देशात अनेक जाती, धर्म, वंश, परंपरा, विभिन्न संस्कृती नांदत असल्या तरी विविधतेत एकात्मता हा भारतीय संस्कृतीचा गुणधर्म इथल्या मातीने जोपासला आहे. काही लोकांनी देशासाठी आत्मार्पण केले तर काहींनी समाजसेवेसाठी वाहून घेतले. याच भारत देशाला संत महंतांची परंपरा लाभली. अनेकांनी आपले कर्तृत्व सिध्द करुन सुधारणावादाची धुरा वाहून विज्ञानाच्या प्रगतीनुसार वाटचाल केली. देश समर्थ बनवण्यासाठी अनेकांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. उदा. संत, वैज्ञानिक, संशोधक, समाजसुधारक, तज्ज्ञ, राजकारणी आदी.

अशा सर्व व्यक्तिमत्त्वामध्ये अमोघ असे व्यक्तिमत्त्व म्हणजेच जे हिऱ्याप्रमाणे चकाकत आहे आणि आपल्या लोकोत्तर कार्यातून स्वतःसाठी न जगता, या देशाच्याही संसारात स्वतःला झोकून देणारे एक अग्रगण्य व्यक्तिमत्त्व म्हणजेच ज्येष्ठ समाजसेवक किसन बाबूराव हजारे ऊर्फ अण्णा हजारे, ज्यांना सत्तेचे कुठलेही कवच नाही. जे मंदिरातील ८ फूट बाय १० फुटांच्या खोलीत राहतात; मात्र समाजसेवेच्या प्रेरणेने भारावलेले आहेत. ज्यांनी आपल्या कार्यकुशलतेतून आपली ओळख जगाला करुन दिली. त्यांच्या एक जीवनकार्याचा, जीवनप्रवाहाचा अभ्यास आपल्याला या प्रकरणात करावयाचा आहे.

## ३.२ बालपणातील कौटुंबिक स्थिती :

१५ जून १९३८ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचा जन्म झाला. भारत हा ब्रिटिशांच्या अमलाखाली असल्याने शासन व प्रशासन हे ब्रिटिशांचे होते. त्या ब्रिटिश प्रशासनाच्या ब्रिटिश सैन्यात अण्णा हजारे यांचे आजोबा जमादार म्हणून नोकरीला होते. अहमदनगरजवळ भिंगार कँटोन्मेंट होती. त्या भागात आजोबांचे हेडक्वार्टर होते आणि भिंगार येथील भाजी मार्केटमध्ये एक भाजीपाल्याचे दुकान असल्याने सर्व कुटुंब भिंगारला वास्तव्याला होते.

आजोबांच्या कुटुंबामध्ये स्वतः आजोबा, अण्णां हजारे यांच्या आजी, अण्णांचे वडील, काका (चुलते) आणि तीन आत्या असा मोठा परिवार होता. अण्णा हजारे यांच्या वडिलांचे लग्न भिंगारलाच झ ााले. बाबूराव हजारे आणि सौ. लक्ष्मीबाई हजारे यांच्यापोटी जन्मलेले पहिले अपत्य म्हणून अण्णा हजारे यांचे सर्वांनी खूप लाड केले. अण्णा हजारे जेमतेम सहा वर्षांचे असताना त्यांच्या आजोबांचे आजारपणामुळे निधन झाले. घरातील कमविणाऱ्या व्यक्तीचे, घराच्या पालकाचे निधन झाल्यामुळे घराचे छत्र हरवले गेले आणि पर्यायाने अण्णा हजारे यांचे वडील घरात सर्वात मोठे असल्याने कुटुंबाचा सर्व भार अण्णांच्या वडिलांवर पडला. एक चुलते अविवाहित होते. अण्णा हजारे यांच्या आजोबांच्या निधनानंतर त्यांचाही विवाह झाला. अण्णा हजारे यांच्या जन्मानंतर अण्णा हजारे यांच्या आई-वडिलांनी तीन मुलगे आणि दोन मुली अशा पाच अपत्यांना जन्म दिला. कुटुंबात सदस्य संख्या जरी वाढली असली तरी कमवणारे फक्त अण्णा हजारे यांचे वडीलच होते. कुटुंबाची खर्चाचे प्रमाण वाढत गेले. उत्पन्न कमी झ ााले आणि खर्च जास्त यामुळे कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हळूहळू कमजोर होत गेली. त्यातल्या त्यात अण्णा हजारे यांचे कुटुंब शहरात असल्यामुळे शहरात खर्च अधिक लागतो. ही बाब अण्णा हजारे यांच्या

वडिलांच्या लक्षात आली आणि त्यांनी राळेगणसिध्दीला स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. राळेगणसिध्दीला अण्णा हजारे यांची काही वडिलोपार्जित शेती होती. शेतीमध्ये श्रम करुन येणाऱ्या उत्पन्नावर उदरनिर्वाह करण्याचा निर्णय अण्णा हजारे यांच्या वडिलांनी घेतला व ते राळेगणसिध्दीला आले. शेती करण्यासाठी नविन बैलजोडी खरेदी केली, त्याच वर्षी दुष्काळ पडला आणि अण्णा हजारे यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अधिकच खालावत गेली. घरात असणारी शिल्लक खर्च होत गेली. हळूहळू सोनेही मोडायला सुरुवात झाली आणि ४ ते ५ वर्षांत घरातील सोनेदेखिल संपले आणि कर्ज घेण्यास सुरुवात झाली. अशाप्रकारे अण्णा हजारे यांच्या बालपणी त्यांची परिस्थिती अतिशय गरिबीची होती.[८]

### ३.२.१ बालपणातील काही आठवणींतील प्रसंग :

शहरातील वाढता खर्च आणि कमी उत्पन्न यातून निर्माण झालेल्या आर्थिक अडचणीं मधून बाहेर पडण्यासाठी अण्णा हजारे यांचे वडील आपले संपूर्ण कुटुंब राळेगणसिध्दी या आपल्या गावी घेऊन आले. वडिलोपार्जित शेती करुन उदरनिर्वाह करण्याचे ठरले. अण्णा हजारे यांचे वय शाळेत जाण्यायोग्य जरी झाले असले तरी राळेगणसिध्दीमध्ये त्या वेळी शिक्षणाची सोय नव्हती. अण्णा हजारे यांचे एक मामा मुंबई येथे एका कापड गिरणीमध्ये पर्यवेक्षक म्हणून काम करत असत. त्यांना मुलगा नव्हता. म्हणून अण्णां हजारे यांच्या आईला हा मुलगा आम्ही मुंबईला शिक्षणासाठी घेऊन जातो असे म्हणून अण्णा हजारे यांचे मामा अण्णांना मुंबईला घेऊन गेले.

घरची कुटुंबाची आर्थिक परिस्थिती खालावल्यामुळे अण्णा हजारे यांना सातवी नंतरचे शिक्षण घेणे शक्य झाले नाही. म्हणून अण्णा हजारे यांनी मुंबईला एक फुलांचे दुकान सुरु केले. ज्यामुळे घरच्याना काही पैशांचा आर्थिक हातभार लागेल. अण्णा हजारे यांना लहानपणापासूनच अन्यायाची चीड होती. त्याचप्रमाणे लहानपणापासूनच समाजकार्याची आवड होती. चांगल्या संस्काराचे धन अण्णा हजारे यांना त्यांच्या आईकडूनच मिळाले. चोरी, लबाडी करु नये, कोणाचेही वाईट चिंतू नये, एखाद्यावर अन्याय होत असेल तर त्याच्या निराकरणासाठी प्रयत्न करावा. या आईच्या संस्कारांच्या धनाची शिदोरी अण्णा हजारे यांना आयुष्यभर प्रेरणा देणारी ठरली. या संस्कारामुळे बालपणापासून अण्णा हजारे यांच्या मनात अन्याय व अत्याचाराबद्दल चीड निर्माण झाली.[९]

बालपणापासूनच अण्णा हजारे यांना अन्याय, अत्याचाराबद्दल किती चीड होती याची जाणीव अण्णांच्या जीवनात बालपणी जे प्रसंग आले त्यावरुन दिसून होते. अण्णा हजारे यांच्या बालजीवनात आलेले ते ठरावीक प्रसंग खालीलप्रमाणे :

पहिला प्रसंग असा, अण्णा हजारे मुंबईला राहत असताना गावाकडे घरच्यांना पैसे पाठवण्याच्या हेतूने फुले विकण्याचा धंदा करु लागले. त्यांचा फुले विकण्याचा धंदा चांगला होऊ लागला. हातात पैसा खेळू लागला. त्याचबरोबर मित्रांचा घोळकाही सभोवती जमू लागला. अण्णा हजारे मित्रांसाठी पैसा खर्च करु लागले. अण्णांचे मित्र अण्णा हजारे यांनी टाकेलेला शब्द झेलू लागले. मित्रांच्या संगतीमुळे सिनेमा पाहण्याची चटक अण्णा हजारे यांना बालपणी लागली. नवीन सिनेमा लागला, की तो बघितल्याशिवाय अण्णा हजारे आणि त्यांच्या मित्रांना चैन पडत नसे. सिनेमाच्या पहिल्या खेळाला अण्णा हजारे व त्यांच्या मित्रांची हजेरी लागे. अन्यायाबद्दल मनात लहानपणापासून चीड होती. गरीब माणसावर अन्याय झाला की

अण्णा हजारे यांचे मन पेटून उठायचे. अन्यायग्रस्ताला मदत करण्यासाठी ते धावायचे. त्यासाठी शारीरिक, आर्थिक नुकसान झाले तरी अण्णा हजारे यांना त्याची पर्वा वाटत नसे. आपल्याकडून कुणाचे वाईट होऊ नये हा विचार मनात सतत जागृत असायचा. गरिबाला मदत करण्यामध्ये धन्यता वाटायची त्यासाठी भले तरी देऊ ...! अर्थात वेळ पडल्यास दोन हात करायची मनाची तयारी असे.

एकदा असाच प्रसंग अण्णा हजारे यांच्यावर बेतला. एक हॉटेलचे मालक अण्णा हजारे यांचे मित्र होते त्यांच्याबरोबर अण्णा हजारे एक दिवस सिनेमाला गेले होते. हॉटेल व्यवसाय असल्याने अण्णा हजारे व त्यांच्या मित्राच्या खिशात नोटा होत्या. एका गुंडाने सिनेमा सुटल्यावर त्यांच्या खिशात हात घातला. हॉटेल मालक चोर, चोर असे ओरडले . त्या गुंडाला अण्णा हजारे यांनी पकडले. गर्दीमध्ये मागचा-पुढचा विचार न करता अण्णा हजारे यांनी त्याला दोन फटके मारले. गुंडाचे पाचसहा साथीदार लगेच अण्णा हजारे यांच्याभोवती जमले. त्यांनी अण्णा हजारे यांना घेरले. एकाने अण्णा हजारे यांचा शर्ट धरला. दुसऱ्याने मागून अण्णा हजारे यांच्या पाठीवर लाथ मारली. त्याक्षणी अण्णा हजारे भयंकर चिडले अण्णा हजारे यांच्या जवळ एक अपंग मित्र ओझा उभे होते. त्यांच्या हातात जाड काठी होती. ती काठी अण्णा हजारे यांनी हातात घेतली आणि वेगाने काठी फिरवून दोन गुंडांना अण्णा हजारे यांनी झोडपले. एक एक जण या समाचार घेतो, असे ओरडत अण्णा हजारे काठी फिरवू लागले. अण्णा हजारे यांचा रुद्रावतार पाहून सारे गुंड पळाले नंतर अण्णा हजारे व त्यांच्या मित्रांनी पोलिस स्टेशनला फिर्याद नोंदवली. दुसऱ्या दिवशी सहा संशयित गुंडांना पोलिसांनी पकडले. ओळख परेडसाठी अण्णा हजारे व त्यांच्या मित्रांना बोलावले. त्यांना अण्णा हजारे व त्यांच्या मित्रांनी ओळखले. रात्री हेच गुंड असल्याचे पोलिसांना अण्णा हजारे व त्यांच्या मित्रांनी सांगितले. गुंडांना अटक झाली.सुटल्यावर तुझ्याकडे पाहतो, असा दम गुंडांनी

अण्णा हजारे यांना भरला. काल मी एकटा होतो तेव्हा तुम्ही पळालात, आता मी एकटा नाही माझेही अनेक सहकारी आहेत. तुम्ही माझे काय करणार ? मी मेल्या आईचे दूध प्यालो नाही ... असे प्रत्युत्तर त्यांना दिले. त्या वेळी अण्णा हजारे त्यांच्या बरोबर अनेक मित्र होते. त्यामुळे अण्णांना स्फुरण चढले होते.[१०]

प्रसंग दुसरा असा, की अण्णा हजारे पंधरा-सोळा वर्षांचे असताना मुंबईच्या गिरणगावमध्ये राहत होते. गिरणगावमध्ये काहीजण दादागिरी करुन दहशत तिने चाळीत राहणाऱ्या गरिबांकडून जबरदस्तीने खोल्या रिकाम्या करुन घेत असत व इतरांना त्या दामदुप्पट पैसे घेऊन राहण्यासाठी देत असत. यासंदर्भात चाळीत राहणाऱ्यांनी अण्णा हजारे व त्यांच्या काही सहकारी मित्रांकडे तक्रारी केल्या. अण्णा हजारे यांना लहानपणापासूनच समाजकार्याची आवड होती. त्यामुळे अण्णा हजारे यांनी व त्यांच्या सहकारी मित्रांनी तक्रारीची दखल घेण्याचे ठरवले.

अण्णा हजारे यांच्याच विचारांचा अन्यायाच्या विरोधात चीड असणाऱ्या दहा-बारा तरुणांचा एक गट तयार झाला होता. गरीब चाळकऱ्यांनी दादागिरी करणाऱ्यांची नावे सांगितली. प्रथम या संदर्भात तक्रारदारांना बरोबर घेऊन पोलिस ठाण्यात रीतसर तक्रार नोंदवली. नंतर आठ-दहा कार्यकर्ते मिळून सरळ त्या गुंडांनाच जाब विचारला. अण्णा हजारे आणि त्यांचे आठ-दहा सहकारी मित्र ज्या पध्दतीने प्रश्न विचारत होते. त्यावरुन त्या गुंडानाही अंदाज आला की, हे सर्व तयारीनेच आले आहेत. याचा परिणाम असा झाला, की ते गुंड सुतासारखे सरळ झाले व आम्ही कोणासही त्रास देणार नाही असे त्यांनी सांगितले. आश्चर्य म्हणजे गरीब चाळकऱ्यांना दादागिरीचा होणारा उपद्रव कमी झाला.

खरे तर गिरणगावातील खोल्या मालकांचा व अण्णा हजारे व त्यांचे सहकारी यांचा परिचय नव्हता, शिवाय कोणाशीही संबंध नव्हता; पण चाळीत राहणाऱ्या गरीबावर अन्याय होत आहे हे सहन न झाल्याने दादागिरी करणाऱ्याविरुध्द अण्णा हजारे व त्यांच्या सर्व सहकारी मित्रांनी पाऊल उचलले. गरिबांवर होणारा अन्याय दूर व्हावा या कर्तव्यभावनेतूनच अण्णा हजारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी या समस्येकडे पाहिले.

खरे तर सामाजिक स्थैर्य, निकोप स्वास्थ्य, तसेच सुदृढ लोकशाहीसाठी अन्यायाविरुध्द दाद मागण्याची संवेदनशीलता समाजाच्या सर्वच घटकांमध्ये हवी; पण दिवसेंदिवस ती हरवत चालली आहे; म्हणुन अण्णा हजारे म्हणतात,

खटाशी खट | धटाशी धट ||

उध्दटाशी उध्दट | झालेची पाहिजे ||

या संताच्या विचारसरणीचा अंगीकार समाजाने केला तर खट, उध्दट यांना धडा मिळाल्याशिवाय राहाणार नाही.[११]

अण्णा हजारे यांच्या बालपणातील तिसरा महत्त्वाचा प्रसंग आहे, तो पोलिसांशी झालेल्या संघर्षाचा. श्रमास प्राधान्य ही अण्णा हजारे यांच्या आईची जीवननिष्ठा होती. त्यामुळे श्रम करुनच पैसा मिळवावा हे बाळकडू अण्णा हजारे यांच्या लहानपणीच आईकडून मिळाले. १९६२ मध्ये अण्णा हजारे मुंबईत राहत होते, त्यावेळचा हा प्रसंग. मुंबईतील काळा चौकी भागात फुलांच्या दुकानात अण्णा हजारे व त्यांचे सहकारी फूलविक्रते  अशी पाच - सहा मुले काम करीत होते. हे दुकान अण्णा हजारे यांनी स्वतःच सुरु केले होते. यातून अण्णा हजारे यांना चांगले उत्पन्न मिळत असे. फुलांच्या दुकानात काम करत

असतांना विविध सामाजिक उपक्रमांमध्येही अण्णा हजारे यांचा सहभाग असे. अण्णा हजारे ज्या ठिकाणी फूल विक्रीचा व्यवसाय करायचे, त्या भागातील पोलिस शिपाई पदपथावरील छोट्या विक्रेत्यांना हप्त्यासाठी नेहमी त्रास द्यायचे. गरीब, छोट्या विक्रेत्यांकडून हप्ता मिळायचा; पण तो वाढून मिळावा, यासाठी पोलिस त्यांना त्रास द्यायचे.

असाच एक प्रसंग घडला. एका भाजी विक्रेत्याकडे पोलिसाने हप्ता वाढवून मागितला. त्या विक्रेत्याने जास्त हप्ता देणे परवडत नाही म्हणून त्या पोलिसास सांगितले. पैसे देत नाही म्हटल्यावर पोलिसाने विक्रेत्याला अपशब्द वापरले. त्याची गचांडी धरुन दादागिरी केली. ही सर्व हकिगत त्या विक्रेत्याने अण्णा हजारे यांना सांगितली. अण्णा हजारे यांनी त्या विक्रेत्यास धीर दिला व हप्ता देऊ नको म्हणून सांगितले. या घटनेनंतर तीन-चार दिवस उलटले. नेहमीप्रमाणे पोलिस आला. व हप्त्याची मागणी करु लागला. हप्ता देण्यास विक्रेत्याने नकार देताच त्या विक्रेत्याला पोलिसाने दांडक्याने मारले. याबद्दल अण्णा हजारे यांनी त्या पोलिसाला जाब विचारला. यामुळे तो जास्तच चिडला, आणि अण्णा हजारे यांच्याशी उध्दटपणे बोलू लागला. त्याच्या या वर्तनाची अण्णा हजारे यांना प्रचंड चीड आली आणि त्याच्याच हतातील दांडके घेऊन त्यालाच अण्णा हजारे यांनी चांगला चोप दिला. दरम्यान ही घटना पोलिस ठाण्यात कळाली. काही पोलिस अण्णा हजारे यांना पकडण्यासाठी आले असता, अण्णा हजारे भूमिगत झाले. सुमारे पाच-सहा महिने अण्णा हजारे भूमिगत होते. भूमिगत झाल्याने फुलांचे दुकान कोण चालवणार? हा प्रश्न होता. शेवटी दुकान बंद करावे लागले. त्यामुळे अण्णा हजारे यांचे फार मोठे आर्थिक नुकसान झाले होते; मात्र एका गरीब माणसाच्या भल्यासाठी आपण अन्यायाच्या विरोधात उभे राहिलो, ही गोष्ट अण्णा हजारे यांच्या मनाला दिलासा देत होती.

“जन्माला आलेल्या प्रत्येकाला जीवन जगण्याचा हक्क आहे. तसेच उदरनिर्वाहासाठी दोन पैसे मिळवणे त्याचे कर्तव्य आहे; मात्र हे पैसे मिळवताना सदाचाराची कास सोडता कामा नये. सरळमार्गी जीवन जगण्यासाठी कोणी व्यत्यय आणत असेल तर त्यास विरोध करणे समाजातील प्रत्येकाचे कर्तव्य आहे,”[१२] असे जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे म्हणतात.

## ३.३ अण्णा हजारे यांचे सैनिकी जीवन :

१९६२ मध्ये मुंबई येथे फुले विकण्याचा व्यवसाय अण्णा हजारे करत होते. बालपणापासून अण्णा हजारे यांना अन्यायाविरुध्द, अत्याचाराविरुध्द चीड होती. अण्णा हजारे ज्या भागात फुले विकण्याचा व्यवसाय करत होते, त्या भागात गरिब भाजीविक्रेते फुटपाथर भाजी विकायचे, फळे विकायचे. मात्र त्या भाजीवाल्या विक्रेत्यांना, फळविक्रेत्यांना पोलिस हप्ता मागून छळायचे. मनाला येईल त्या रकमेचा हप्ता गोळा करायचे. बिचाऱ्या फळे, भाजीविक्रत्यांचे पैसे हप्त्यामध्ये जायचे. कष्ट करुनही त्यांना काही शिल्लक रहात नसायचे. एका भाजी विक्रेत्याकडे हप्ता द्यायला पैसे नव्हते. पोलिसाने त्याला शिवीगाळ केली. शेवटी काठीने बडवले ते पाहून अण्णा हजारे यांचा राग अनावर झाला. पोलिस व अण्णा हजारे यांच्यात शाब्दिक चकमक झाली. पोलिसांनी अण्णा हजारे व त्यांच्या सहकाऱ्यांवर अपशब्दांची लाखोली वाहिली. अण्णा हजारे भडकले. पोलिसाच्या हातातील काठी हिसकावून त्याला चांगले बडवले. त्याच्या डोळ्यास आठ टाके पडले. पोलिसाने अण्णांच्या विरोधात फिर्याद दिली. अण्णांच्या विरोधात पकड वॉरंट काढण्यात आले; अण्णा भूमिगत झाले. ही बातमी मुंबईत कामधंदा करणाऱ्या राळेगणकरांनी गावी पोचविली. वाईट संगतीत पोरगं बिघडल. गुंड बनलं असा ग्रामस्थांचा

गैरसमज झाला. राळेगणला तर लोक अण्णांकडे तिरस्काराने पाहू लागले; परंतु आपण गुंड नाही असे त्यांचे मन त्यांना सांगत होते. तू सत्कार्य केलेस, असे अण्णा हजारे त्यांचे मन त्यांना सांगत होते. कालांतराने राळेगणकरांचा गैरसमज दूर झाला. समाजाला दुष्ट प्रवृत्ती, अन्याय आवडत नाही. अण्णा हजारेंनी मारामारी का केली हे त्यांना समजू लागले त्यामुळे अण्णा हजारे यांच्या बद्दलचा आदर वाढला, पण अण्णा हजारे यांचे बरेच दिवस भूमिगत राहिल्याने मोठे आर्थिक नुकसानही झाले होते. फूलांची दुकान बंद करावे लागले. ते वर्ष १९६२ चे होते.[१३]

### ३.३.१ सैन्यात भरती -

सन १९६२ मध्ये चीनचे आपल्या देशावर आक्रमण झाले. शेजारच्या देशापासून आपणास कोणताही धोका नाही, अशी आपली समजूत झाल्याने, तसेच लष्कराच्या आधुनिकीकरणास हवे तेवढे प्राधान्य न दिल्याने आपल्या देशाचे या युध्दात मोठे नुकसान झाले, शिवाय जगामध्ये मानहानीही पत्करावी लागली. या वेळी मोठ्या प्रमाणावर भारतीय जवान मारले गेले आणि भारताला सैन्य वाढवण्याची गरज भासली. म्हणून भारत सरकारने भारतीय युवकांना एक आवाहन केले होते, की सीमेच्या रक्षणासाठी देशाला तरुणांची गरज आहे. शारीरिकदृष्ट्या उंची, वजन, छाती यांबाबत अण्णा हजारे लष्करात दाखल होण्यास अपात्र होते; पण देशप्रेमामुळे त्यांनी लष्करात दाखल होण्यासाठी प्रयत्न करुन पाहण्याचे ठरवले. त्या वेळी भरती केंद्रामध्ये न होता, रोजगार विनिमय केंद्रामध्ये इच्छुक असणाऱ्या तरुणांना बोलावण्यात आले आणि आणीबाणीची वेळ असल्याने अण्णा हजारेंची स्थलसेनेसाठी निवड झाली. लष्करात भरती होण्यासाठी त्यांना घरच्यांचा विरोध होता; मात्र तरी

अण्णांनी देशसेवेसाठी लष्करात भरती होण्याचा निर्णय घेतला आणि १९६३ मध्ये अण्णा हजारे लष्करात दाखल झाले. तांत्रिक शिक्षण व चालक (टेक्निकल व ड्रायव्हिंग) या शाखेत अण्णांना प्रवेश मिळाला. सुरुवातीचे दोन महिने मुंबईमध्ये बॉम्बे मोटार ड्रायव्हिंग स्कूलमध्ये अण्णांना प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्यावर पुन्हा परीक्षा घेण्यात आली आणि अण्णांसहित तेरा जवानांना मुंबईहून औरंगाबादला पाठवण्यात आले. औरंगाबादला आर्मी सप्लाय कोअरचे प्रशिक्षण केंद्र उघडण्यात आले होते. देशातील विविध भागांतील सुमारे सहाशेपेक्षा अधिक जवान या कॅम्पमध्ये दाखल झाले होते. चीनच्या आक्रमणामुळे अचानकपणे सैन्य वाढवावे लागल्याने सैन्यात नव्याने दाखल झ ाालेल्या जवानांना युनिफॉर्म, बूट यांची सुविधा नव्हती. महिनाभर अण्णा व त्यांच्यासोबतच्या जवानांनी नेहमीच्या वापरायच्या कपड्यांवरच परेड केली. बूट नसल्याने ते चप्पल घालून परेडमध्ये सहभागी होऊ लागले. औरंगाबादमध्ये अचानक कॅम्प सुरु केल्याने पुरेशा पाण्याची व्यवस्था देखील नव्हती. १९६३ मध्ये औरंगाबादला पाण्याचा दुष्काळच होता. आवश्यक तेवढे पाणी नसल्याने अंघोळी ऐवजी ओल्या फडक्याने अंग पुसावे लागे. कपडे धुण्यासाठी दीड-दोन किलोमीटरवर असलेल्या नाल्यावर जावे लागे. कॅम्पमध्ये पहाटे साडेचार ते रात्री दहा वाजेपर्यंत सतत प्रशिक्षणाचे वेगवेगळे कार्यक्रम चालत असत.

एका बाजूला पाण्याचे दुर्भिक्ष, तर दुसऱ्या बाजूला सर्व सुविधांचा अभाव अशा अवस्थेत हा संघर्ष चालू होता. अण्णा हजारे व त्यांचे सहकारी यांना येथील सर्व परिस्थिती अडचणीची वाटू लागली. एक दिवस मुंबईहून आलेल्या अण्णा हजारे व त्यांच्या सहाकाऱ्यांनी प्रशिक्षणातील उणिवा, गैरसोयी लक्षात घेऊन कमांडरला पत्र दिले. आम्ही पुन्हा मुंबईस जाऊ इच्छितो, आम्हाला सोडा, असा अण्णा हजारे व त्यांच्या सहकारी जवानांनी पत्रात मजकूर लिहिला होता.

अण्णा हजारे व त्यांच्या सहकारी जवानांना कमांडरनी बोलावले आणि आपल्या अनुभवाचे चार शब्द सांगितले. तुम्हाला येथे सुविधा उपलब्ध नाहीत आणि त्रास होतो, म्हणून तुम्ही परत जाण्याचा निर्णय घेतला आहे, ही बाब योग्य नाही. ज्या वेळी आपली शत्रूबरोबर लढाई चालू असते. त्या वेळी तर आज येथे ज्या सुविधा आहेत, त्यासुध्दा नसतात. मग अशा वेळी तुम्ही शत्रूंकडे पाठ फिरवून परत येणार का? तसे झाले तर भारतीय जवानांच्या स्वाभिमानाचे काय? आपल्या मातृभूमीच्या रक्षणाचे काय? एक गोष्ट लक्षात असू द्या, की आज तुम्ही नैराश्य घेऊन येथून परत गेलात तर तुम्ही तुमच्या आयुष्यात कोणत्याही कार्यात यशस्वी होणार नाहीत; मात्र येथे यशस्वी झालात तर कोठेच अपयशी ठरणार नाही.

अण्णा हजारे म्हणतात की अर्ध्या तासाच्या या बौध्दिकामधून आम्हा जवानांना खूप काही शिकायला मिळाले. त्याचबरोबर नवीन उत्साह मिळाला व मुंबईला परत जाण्याचा विचार आम्ही रद्द केला आणि सर्वांनी निर्णय घेतला, 'दिल दिया है, जान भी देंगे, ये वतन तेरे लिये!' आणि त्या दिवसापासून खऱ्या अर्थाने आमचे सैनिकी जीवन सुरु झाले. थकवा, कंटाळा या गोष्टी दूर गेल्या.

अण्णा हजारे यांना त्यांच्या सहकारी मित्रांच्या तुकडीचा प्रमुख करण्यात आले होते. सुरुवातीचे एक वर्षाचे प्रशिक्षण संपत आले होते. 'पास आऊट' परेड होणार होती. अण्णा हजारेंच्या डाव्या पायाच्या घोट्याजवळ जखम झाली होती. बुटामुळे त्या जखमेला त्रास होत होता. म्हणून अधिकाऱ्याने परेड मध्ये सहभागी होण्यास अण्णा हजारे यांना परवानगी नाकारली; मात्र अण्णा हजारे यांच्या शरिरातील सैनिक जवान जागा झालेला असल्याने अण्णा हजारे परेडमध्ये सहभागी होण्यासाठी आग्रही होते परेड एक तास चालली. शेवटी परेड मध्ये त्यांना मूर्च्छा आली. ते जमिनीवर कोसळले. काही जवानांनी अण्णा हजारेंना उचलले व शेजारी असलेल्या झाडाच्या सावलीत नेले. अण्णांचे बूट काढले असता, पायाच्या जखमेतून

रक्तस्त्राव होत होत असल्याचे दिसले. ही स्थिती पाहून व एवढी मोठी जखम झालेली असतानाही अण्णा हजारे परेडमध्ये सहभाग घेतला होता. याबद्दल अधिकाऱ्यांना अण्णा हजारे यांचा अभिमान वाटला.

अण्णा हजारेंचे व त्यांच्या सहकारी मित्रांचे प्रशिक्षण पूर्ण झाले होते. १ जानेवारी १९६४ ला अण्णा हजारे व त्यांची कंपनी औरंगाबादहून दिल्लीस निझाली. पंजाबमधील अंबाला छावणीत ती जाणार होती. कंपनी दिल्लीत पोचली तेव्हा तेथे थंडीचा मोठा कडाका होता. साधे शर्टचे बटनही लावता येत नव्हते, एवढी प्रचंड थंडी होती. अशा थंडीत दिल्लीत महिनाभर थांबून दीडशे गाड्यांचा ताफा अंबाला छावणीकडे रवाना झाला. नंतर अंबाला ते कालका गाड्या लोड करुन भरलेल्या गाड्या चालविण्याचे प्रशिक्षण सुरु झाले. काही दिवसांनंतर हिमाचल प्रदेशात भरलेल्या गाड्या घेऊन जाण्याचे प्रशिक्षण सुरु झाले. या प्रशिक्षणानंतर चीनच्या सीमांनजीक टापरी-शुगर सेक्टर या हिमालयातील अत्यंत अवघड ठिकाणी प्रत्यक्ष साहित्य पोचवण्याचे काम सुरु झाले. एका बाजूला हजारो फूट खोल दरी तर दुसऱ्या बाजूला डोंगरकडे अशा अवझड रस्त्यावरुन ही वाहतूक अण्णा हजारे यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना करावी लागत असे. एक जवान या नात्याने अण्णा हजारे यांचा जीवनातील हा संघर्ष चालू होता.[१४]

### ३.३.२ मिझोराममधील प्रसंग -

सन १९६६-६७ च्या दरम्यान मिझोरामध्ये राहण्याचा योग अण्णांना आला. मिझोराम हा हिमालयाच्या रांगेतील लहानसा प्रदेश. येथील नागरिकांचा स्वतंत्र मिझोरामसाठी संघर्ष चालू होता. मिझ ाोराम व म्यानमारच्या सीमेवर लष्कर असल्याने त्यांच्यासाठी लागणारे अन्नधान्य, कपडा, पेट्रोल, डिझेल

व इतर साहित्य बंदूकधारी सैनिकांच्या संरक्षणातच न्यावे लागे. मिझोराममधील नागरिक हे स्वभावाने प्रेमळ आणि प्रामाणिक, फक्त मिझोराम आम्हाला स्वतंत्र मिळावा, यासाठी त्यांचा लढा होता. विशेषतः सैनिकांवर मिझो अतिरेक्यांचा रोख असायचा. पाकिस्तान आणि ब्रह्मदेशकडून त्यांना शस्त्रपुरवठा होत होता. छुप्या पध्दतीने ते सैन्यातील जवानांशी लढत असत. असेच एक दिवस गाड्यांचा ताफा साहित्य घेऊन जात असताना रस्त्याच्या कडेला मिझो अतिरेकी दबा धरुन बसले होते. कळणार नाही अशा काळ्या धाग्याने बांधलेले हँडग्रेनेड त्यांनी रस्त्यावर ठेवले होते. या रस्त्यावरुन पहिली गाडी गेल्यावर या हँड ग्रेनेडचा काळा धागा ओढला जाऊन सेफ्टी पिन निझाली गेली व स्फोट होऊन दोन नंबरच्या गाडीतील दोन जवान ठार झाले. अण्णा हजारे असलेली गाडी तिसऱ्या क्रमांकावर होती. अण्णा हजारे यांच्या सोबत संरक्षणासाठी असलेल्या जवानांनी अतिरेक्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला; पण ते सापडले नाहीत. जंगलात पळून गेले. काळ आला होता; पण वेळ आली नव्हती. यामुळे या संकटातून अण्णा हजारे वाचले. वर्षभर मिझोरामच्या संघर्षमय वातावरणात अण्णा हजारे राहिले. देशसेवेसाठी प्राण तळहातावर घेऊनच हे कार्य चालू होते.

### ३.३.३ कश्मीरमधील तो दिवस -

कश्मीरमध्ये १९७२ ते १९७४ अशी तीन वर्षे राहण्याचा प्रसंग अण्णा हजारे यांच्या जीवनात आला. एका बाजूला पाकिस्तान, तर दुसऱ्या बाजूला चीनची सीमा असल्याने सीमेवरील जवानांसाठी लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तू व लढाईसाठी लागणारी रसद पोचविण्याचे काम अण्णा हजारे यांना करावे लागत असे. चीनच्या सीमेवर सतत बर्फ व रस्ता चढाईचा असल्याने गाडी चालविणे कठीण जात

असे. बर्फ अधिक पडल्यावर गाड्यांच्या टायरवर नॉनस्कट चेन लावून गाड्या चालवाव्या लागत. अन्यथा गाड्या घसरुन अपङात होण्याची शक्यता असे.

असाच एका रविवारी अण्णा हजारे यांच्या जीवनात एक प्रसंग घडला. अण्णा हजारे यांची कंपनी श्रीनगरच्यापुढे बारामुल्लाजवळील पट्टन गावी होती. दर रविवारी प्रत्येक धर्माच्या जवानांसाठी प्रार्थना होत असे. ख्रिश्चन धर्मगुरुंना श्रीनगर येथून आणावयाचे होते. ही जबाबदारी अण्णा हजारे यांच्यावर सोपविण्यात आली होती. अण्णा हजारे यांच्या सोबत त्यांच्या प्लाटूनचे सिनियर नायकसाहेब होते. ते स्वतःगाडी चालवत होते. बर्फ मोठ्या प्रमाणात पडलेला असल्याने आपण टायरला नॉनस्कट चेन लावून गाडी काढू, असे अण्णा हजारे यांनी नायक साहेबांना सांगितले; पण चेनची गरज नाही; आपण हळूहळू जाऊ, असे ते म्हणाले. कंपनीपासून अण्णा हजारे व नायकसाहेब दहा किलोमीटर अंतरावर गेले. समोरुन एक बस येत होती. नायकसाहेबांनी जीप रस्त्याच्या बाजूला घेत ब्रेक लावला आणि जीप रस्त्याच्या कडेला खड्ड्यात घसरली. सुदैवाने दोघांनाही लागले नाही; मात्र जीपचे नुकसान झाले. सैन्यात असताना अनेक वेळा अण्णा हजारे यांना अशा कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागले.[१५]

## ३.३.४ जवानांच्या हक्कासाठी संघर्ष -

सैन्यात असताना अण्णा हजारे यांना जसा शत्रूशी, भौगोलिक परिस्थितीशी संघर्ष करावा लागला. तसाच जवानांवरील अन्यायाविरुध्दही संघर्ष करावा लागला. पंजाबमधील अंबाला येथे अण्णा हजारे व त्यांची कंपनी होती. या कंपनीचे कमांडिग ऑफिसर मेजर होते. सात्त्विक वृत्तीचे असल्याने जवानांच्या बँकेच्या बचत खात्यात काही रक्कम शिल्लक असावी, असा त्यांचा विचार होता. कंपनीतील

सर्वच अधिकारी व जवान यांच्यासाठी त्यांनी नियम केला होता, की सुटीवर जातानासुध्दा प्रत्येकाने आपल्या खात्यात काही रक्कम शिल्लक ठेवावी. कंपनीच्या रोखपालाला तशी त्यांनी ऑर्डरच दिली होती.

सन १९६४ मध्ये जवानांना मिळणारा पगार फारच कमी होता. सुटीवर घरी परतताना घरच्या सर्वांच्याच अपेक्षा असतात, की आपल्यासाठी काहीतरी आणणार किंवा काही पालकांनी आपला मुलगा सुटीवर येणार आहे, तेव्हा तो काही पैसे आणील या आशेने कोणाकडून तरी पैशांचे व्यवहार केलेले असतात. पत्नीला वाटत असते, की आपले पतिराज सुटीवर घरी आल्यावर आपल्या मनाप्रमाणे हौसमौज करता येईल. खात्यामध्ये सक्तीने काही पैसे शिल्लक ठेवण्याची नाराजी अण्णा हजारे यांना अनेक जवानांकडून ऐकावयास मिळाली; पण कंपनी कमांडरच्या पुढे बोलण्यास कोणीच तयार नव्हते.

पूर्वी राजेमहाराजे जनतेचा दरबार भरवत असत. अशा दरबारात जनतेच्या अडचणी एकून त्या दूर करण्याचा प्रयत्न होत असे. सैन्यातही या पध्दतीने कमांडिंग ऑफिसर आपल्या कंपनीतील ऑफिसर जवानांचा महिन्या, दोन महिन्यांचा दरबार भरवून कंपनीत जवानांना काही सार्वजनिक त्रास होतो का याची विचारणा करीत असत. असाच दरबार कंपनी कमांडरने भरविला. अण्णा हजारे व त्यांच्या सहकारी जवानांना विचारणा केली, की कंपनीत तुम्हाला काही त्रास होतो का.. अण्णा हजारे उभा राहिले आणि कमांडर साहेबांना सांगितले, सुटीवर जाताना जवानांना त्यांच्या हक्काचे पैसे मिळायला हवेत. त्यामध्ये कोणतीही कपात करु नये; परंतु कंपनी कमांडरने अण्णा हजारे यांचा हा प्रस्ताव फेटाळला व काही रक्कम खात्यात शिल्लक ठेवावीच लागेल असे सांगितले. जवानांच्या दृष्टीने ही बाब अण्णा हजारे यांना अन्यायकारक वाटत होती. हक्काचे सर्व पैसे घेतल्याशिवाय सुटीवर जायचे नाही असे अण्णा हजारे

यांनी ठरविले. कंपनीतील प्रत्येक जवानाने सुटी घेतल्याचा अहवाल कंपनीने बटालियन कमांडरला व बटालियन कमांडरने डिव्हिजन कमांडरला द्यावा लागतो.

अण्णा हजारे सुटीवर गेले नाहीत; त्यामुळे कमांडरने त्यांना मुलाखतीसाठी बोलावले, कंपनीच्या सर्व जवानांमध्ये हा चर्चेचा व कुतूहलाचा विषय झाला होता. कारण हा जवानांच्या हिताचा प्रश्न आहे. कंपनीमध्ये अण्णा हजारे यांना सर्व शास्त्रीजी नावाने संबोधित असत. कमांडर व शास्त्रीजींमध्ये उद्या काय होणार, याबाबत जवानांमध्ये कमालीची उत्सुकता होती. ठरल्याप्रमाणे अण्णा हजारे यांना कमांडिंग साहेबांसमोर नेण्यात आले. थंडीचे दिवस असल्याने कमांडिंग साहेब कार्यालयाबाहेर टेबल ठेवून बसले होते. त्यांनी अण्णा हजारे यांची विचारपूस सुरु केली. बाकीचे जवान लपूनछपून आपापल्या जागेवरुन अण्णा हजारे व कमांडिंग साहेबांच्या संवादाकडे लक्ष देत होते. हक्काचे सर्व पैसे मिळाल्याशिवाय मी सुटीवर जाणार नाही असे अण्णा हजारे यांनी कमांडिंग साहेबांना निक्षून सांगितले.सुटीवर जाणार नसशील तर तसे लिहून दे, असा आदेश त्यांनी दिला. मी लिहून देणार नाही, असे अण्णा हजारे यांनी कमाडिंग साहेबांना सांगताच कमांडर अण्णा हजारे यांच्यावर चिडले व कंपनी सुभेदार, मेजरला सांगितले, की याला जेलमध्ये (क्वार्टर गार्ड) बंद करा. कमांडरचा आदेश होताच अण्णा हजारे यांनी कमरेचा पट्टा काढला व टेबलावर ठेवला तसेच शर्ट काढणार तोच कमांडर उठून उभे राहिले आणि अण्णा हजारे यांचा हात धरत म्हणाले, “तु हे काय करत आहेस?” अण्णा हजारे म्हणाले, “माझ्यासह जवानांवर अन्याय होणार असेल तर मी घरी जाण्यास तयार आहे. मला घरी पाठावा. मी आनंदाने घरी जाईन. मात्र अन्याय सहन करणार नाही.” कमांडर साहेबांचा राग काही प्रमाणात कमी झाला होता. “तुझ

यासाठी मी पाचशे रुपये जास्त देण्यास सांगतो. ते घेऊन सुटीवर जा.” “मला कुणाचीही मेहरबानी नको, मला माझ्या हक्काचे सर्व पैसे मिळाले तरच मी सुटीवर जाईन,” असे अण्णा हजारे यांनी पुन्हा सांगितले.

बँकेत काही पैसे शिल्लक ठेवण्याचा आदेश कमांडर साहेबांचा होता. बटालियन किंवा डिव्हिजनचा नव्हता. त्यामुळे कमांडिग साहेबांना अडचणीचे झाले होते. शेवटी त्यांना जवानांचे सर्व पैसे देण्याचा निर्णय घ्यावा लागला. या निर्णयामुळे जवानांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. पैसे शिल्लक ठेवण्याचा कमांडरचा निर्णय जवानांच्या हिताच्या दृष्टीने चुकीचा नव्हता; पण जवान जेव्हा सुटीवर घरी जातो, तेव्हा घरच्यांच्याही काही अपेक्षा असतात. अशा वेळी शिल्लक रक्कमही जवानास मिळाली तर ती हवी असते. या दृष्टीने जवानांची बाजूही महत्त्वाची होती. अशा रीतीने जवानांसाठी अण्णा हजारे यांना संघर्ष करावा लागला; मात्र हा संघर्ष करीत असताना अण्णा हजारे यांचे कामही तेवढेच स्वच्छ असायचे. कोणालाही बोट दाखवण्याचा वाव मिळू नये याची अण्णा दक्षता घेत असत.[१६]

### ३.३.५ कॅप्टनला धडा -

सीमेवर असलेल्या जवानांना जीवनावश्यक वस्तू आणि लढाईसाठी गोळा बारुद, रसद पोचविणे हे अण्णा हजारे यांच्या कंपनीचे काम होते. एका वेळेस २५ ते ३५ गाड्या हे काम करीत. हिमालयातील सीमेपासून पायथ्याशी अडीचशे ते तीनशे किलोमीटर परिसरात सर्व साहित्याचे डेपो असत. डेपोमध्ये गाड्या भरुन हे साहित्य सीमेवर पोचवून परत तीनचार दिवसांनी गाड्या कंपनीत येत असत. या सर्व गाड्यांच्या कामाची देखभाल करण्यासाठी एका अधिकाऱ्याची नियुक्ती केली जात असे.

सिलीगुडी डेपोतून (पश्चिम बंगाल) विविध प्रकारचे साहित्य घेऊन अण्णा हजारे यांच्या कंपनीच्या गाड्यांचा ताफा सिक्कीमची राजधानी गंगटोक येथे जाणार होता. या रस्त्यावर रांगली या छोट्या गावात दारुचा कारखाना होता. विविध साहित्य पोच केल्यावर परतीच्या प्रवासात जवान एक-दोन बाटल्या विकत घेत असत. त्या वेळी रमची बाटली पाच रुपये, तर ब्रँडीची सात रुपयांना मिळे.

अण्णांच्या कंपनीचे जवान दारुच्या बाटल्या आणतात ही बातमी कंपनी कमांडरला समजली. एकदा सर्व साहित्य सीमेवर पोच करुन गाड्या परत आल्या, तेव्हा कंपनी कमांडरने सर्व गाड्या कंपनीच्या ग्राऊंडवर उभ्या करण्याचा आदेश अधिकाऱ्यास दिला. गाड्या कशासाठी उभ्या केल्या जात आहेत, हे कोणालाच कळेना. सायंकाळची वेळ होती. गाड्यांच्या सर्व चालकांना परेडसाठी उभे केले जाते, तसे उभे करण्यात आले. कंपनी कमांडरनी स्वतःच्या देखरेखीखाली अधिकाऱ्यांना गाड्यांची तपासणी करावयास सांगितली. काही गाड्यांमध्ये जवानांनी आणलेल्या एक-दोन बाटल्या सापडल्या. अण्णा हजारे यांच्या गाडीची देखील तपासणी झाली; पण एकही बाटली सापडली नाही. कारण अण्णा हजारे कधी रम पीत नव्हते. त्यामुळे बाटली मिळण्याचा प्रश्नच नव्हता.

सर्व तपासणीनंतर अण्णा हजारे कंपनी कमांडरसाहेबासमोर उभे राहिले आणि त्यांना म्हणाले, “जवान थंडी वाऱ्यामध्ये वावरताना एखाद-दुसरी बाटली आणत असतील हा त्यांचा दोष आहेच, पण तुम्हाला तपासणी करावयाची असेल तर कॅप्टन साहेबांच्या गाडीची करा, त्यांची गाडी समोरच्या गॅरेजमध्ये आहे.” वास्तविक ती गाडीही जवानांच्या गाड्यांबरोबरच उभी करावयास हवी होती. तसे न करता गॅरेजमध्ये उभी करण्यात आली होती.

अण्णा हजारे यांनी कमांडर साहेबाकडे रिपोर्ट (तक्रार) केल्यावर बाकीचे सर्वच जवान अवाक् झाले. कमांडर साहेबांनी त्या गाडीची तपासणी केली. त्यात दारुच्या बाटल्यांच्या पेट्या दिसून आल्या. अण्णा हजारे यांनी केलेल्या तक्रारीचा परिणाम म्हणून कॅप्टन साहेबांवर कारवाई करण्यात आली. हीच दारु सिलिगुडीमध्ये दामदुप्पट भावाने विकली जात होती, ही बाब योग्य नव्हती. ज्यांनी जवानांना शिस्त लावायची, तेच जर असे वागू लागले तर, शिस्त कशी राहणार, हा प्रश्न अण्णा हजारे यांच्या दृष्टीने महत्त्वाचा होता.

केवळ जवानांवर अन्याय होईल असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वागू नये आणि कॅप्टन साहेबांनाही धडा मिळावा हाच तक्रार करण्यामागे अण्णा हजारे यांचा हेतू होता.[१७]

## ३.३.६ आपणही निर्दोष हवे...

अण्णा हजारे यांच्या कंपनीत असणाऱ्या गाड्यांची वार्षिक तपासणी होत असे. या तपासणीत कंपनीतील सर्व गाड्यांमध्ये अण्णा हजारे यांचा क्रमांक प्रथम असायचा. यासाठी अण्णा हजारे महिनाभर जिवापाड मेहनत घेत असत. प्रत्येक गाडीसाठी काही दुरुस्तीचे साहित्य दिले जाई. त्यांचीही अधूनमधून तपासणी होत असे. असेच एकदा अण्णा हजारे यांच्या कंपनीतील गाड्यातील साहित्याची तपासणी कंपनीचे कॅप्टन करणार होते. यासाठी सर्व साहित्य व्यवस्थित मांडण्यात आले होते. उन्हाळ्याच्या दिवसांत थंड पाण्यासाठी प्रत्येकास गाडीबरोबर वॉटरबॅग दिली जायची. अण्णांच्या वॉटरबॅगला तेलाचा छोटा डाग पडला होता, तो डाग पाहून कॅप्टन अण्णा हजारे यांच्यावर रागावले. हा अण्णा हजारे यांचा फार मोठा दोष नव्हता; पण आपण एक अधिकारी आहोत, ही 'ग'ची बाधा त्यांना झाली होती. अण्णा

हजारे त्या वेळी कॅप्टनसाहेबांना काहीच उत्तर दिले नाही; मात्र साहित्याची तपासणी झाल्यानंतर कॅप्टनसाहेबांनी केलेली चुक त्यांच्या निदर्शनाला आणून दिली.

अण्णा हजारे व त्यांच्या सहकारी जवानांच्या गाड्यांचा ताफ्याचे हे कॅप्टन प्रमुख होते. अण्णा हजारे व त्यांचे सहकारी जवानांसाठी लागणारे साहित्य पोच करुन परत येत होते. रस्त्यात एका नदीमधून गाड्या येत असताना, पहिली गाडी नदीच्या मध्यभागी येऊन वाळूमध्ये घसरायला लागली. मागील दोन्ही गाड्यांचीही हीच गत झाली होती. गाड्या पुढे जात नव्हत्या अथवा मागेही सरकत नव्हत्या. ही वेळ सायंकाळच्या सातची होती. या परिस्थितीत गाड्या क्रेनने  बाहेर ओढून काढणे, हे कॅप्टनसाहेबांचे कर्तव्य होते. सकाळी क्रेन आणून गाड्या बाहेर काढू तोपर्यंत नदीबाहेर व नदीत गाडीमध्ये असणाऱ्या सर्व चालकांनी गाडीमध्येच झोपण्याचे आदेश कॅप्टनने दिले व स्वतः शहरातील पन्नास किलोमीटरवरील विश्रामगृहावर जाऊन राहिले.

रात्री हिमालयाच्या डोंगरभागात जोरदार पाऊस झाला आणि नदीला पूर आला. पुराच्या पाण्याच्या आवाजाने एका जवानाला जाग आली. त्याने आरडाओरडा करुन सर्वांना उठवले. तीनही गाड्यांतील चालक अंगावरील कपड्यानिशी उड्या मारुन नदीतून बाहेर पडले. नंतर तीनही गाड्या पुराच्या पाण्याने वाहून गेल्या. तीन महिने या गाड्यांचा शोध घेण्याचे काम चालले होते; पण तपास लागला नाही. गाड्यांचे नुकसान झालेच, शिवाय शोधकार्यावरही बराच खर्च  झाला. त्या वेळी अण्णा हजारे यांनी कॅप्टन साहेबांना आठवण करुन दिली, की एका छोट्याशा तेलाच्या डागाबद्दल आपणास राग आला; पण आपल्या निष्काळजीपणामुळे तीन गाड्यांचे नुकसान झाले, त्याचे काय? इतरांचे दोष शोधत असताना, आपणही तेवढेच निर्दोष असायला हवे.

अण्णा हजारे यांच्या कामाबद्दल कॅप्टन साहेबांना जाणीव नव्हती. कारण ते नवीनच होते. इतर जवानांनी जेव्हा त्यांना अण्णा हजारे यांच्या कामाबद्दल कल्पना दिली तेव्हा त्यांनाही आपल्या चुकीची जाणीव झाली.

दुसऱ्या दिवशी कॅप्टन साहेबांनी अण्णा हजारे यांना बोलावून घेतले. आपल्याबद्दल मला पुर्ण माहिती नसल्याने मी रागावलो. याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो. जवानाच्या हितासाठी सैन्यातील पंधरा वर्षाच्या कालावधीत अकरा अधिकाऱ्याबरोबर अण्णा हजारे यांना वेळोवेळी संघर्ष करावा लागला. यामध्ये अण्णा हजारे यांचा वैयक्तिक स्वार्थ काहीच नव्हता; पण लहानपणापासूनच अन्यायाविरोधात चीड असल्याने वेळोवेळी त्यासाठी अण्णा हजारे यांना संघर्ष करावा लागला.[१८]

## ३.३.७ जवानांच्या प्रश्नांची दखल -

एका कॅन्टोन्मेंट भागात जेवढे सैनिक असतात, त्या सर्वांसाठी रोज लागणारा भाजीपाला, फळे ही खासगी ठेकेदाराकडून खरेदी केली जात. ही फळे, भाजीपाला खरेदी करताना, पुरवठा विभागाच्या शेडमध्ये ठेकेदाराने सर्व फळे, भाजीपाला व्यवस्थित लावून ठेवायचा असतो. आर्मी सप्लाय कोरच्या बटालियनच्या कमांडरनी  या सर्व भाजीपाल्याची तपासणी करुन, चांगल्या दर्जाचा माल निवडून खराब माल बाजूला काढायचा असतो.

अण्णांच्या कंपनीत येणारी फळे कधी कच्ची, तर कधी अधिक पक्व असत. यामुळे ती खाण्यायोग्य नसत. ही बाब अण्णांच्या मनाला प्रकर्षाने खटकत असे. ठेकेदार व भाजीपाला, फळे यांच्या

खरेदीस मान्यता देणारे सप्लाय कोअरचे अधिकारी यांच्यात काही साटेलोटे असल्याशिवाय हे घडणार नाही, असे अण्णा हजारे यांना मनोमन वाटे.

एकदा अण्णा हजारे यांच्या बटालियनमधील सर्व पाच कंपन्यांचे जवान, अधिकारी यांचा दरबार भरला असता, जवानांसाठी मिळणाऱ्या कच्च्या व अतिपक्व फळांचा प्रश्न अण्णा हजारे यांनी उपस्थित केला. फळे योग्य प्रकारे पास करुन द्यावीत, असा  आग्रह अण्णा हजारे यांनी धरला. यावर योग्य ती कार्यवाही केली जाईल असे उत्तर मिळाले.

बटालियनमधील कँटीनमधील वस्तू बाजारभावापेक्षा जास्त भावाने विकल्या जातात, हा जवानांवर अन्याय होता. प्रत्येक वस्तूची किंमत बाहेरच्या बाजारभावापेक्षा कमी ठरवून द्यावी. किंवा प्रत्येक कंपनीमध्ये सीएसडी कँटीन उघडावीत, अशी मागणी अण्णा हजारे यांनी केली यावर विचार केला जाईल असे उत्तर कर्नलसाहेबांनी दिले. कंपनीच्या लंगरसाठी खरेदी करण्यात येणाऱ्या मिरची - मसाल्याची किंमतही बाजारभावापेक्षा जास्त असायची, तसेच दर्जा देखील चांगला नसायचा. यासंदर्भातही अण्णा हजारे यांनी दरबारात प्रश्न उपस्थित केला. हे सर्व प्रश्न कमांडर साहेबांच्या विरोधातील होते. कारण ते प्रश्न त्यांच्याशी निगडित होत. दरबारामध्ये ते अण्णा हजारे यांच्यावर रागावले, पण हे सर्व प्रश्न दरबारातले असल्याने त्यांची नोंद झालेली होती.

अण्णा हजारे यांच्या लष्करातील कालावधीत जवानांसंदर्भातील वेगवेगळ्या प्रश्नांवर अण्णा हजारे यांनी सातत्याने आवाज उठविला. यात अण्णा हजारे यांना यश मिळत गेले आणि जवानांवरील अन्याय दूर झाला.

सैन्यातील पंधरा वर्षांच्या सेवेमध्ये सहा वर्षे हिमालयातील बर्फामध्ये राहण्याचा योग आला. काही वेळेस समुद्रसपाटीपासून काही हजार फूट उंचीवर राहावे लागले. ऑक्सिजन कमी असल्याने थोडे चालले तरी दम लागे. त्यासाठी तेथे विशेष आहाराची व्यवस्था केलेली असे. रात्री झोपण्यासाठी लागणारे, तसेच बर्फात वावरताना लागणारे, असे विशेष कपडे असायचे. येथे डिझेल गाडी चालू करताना अनेक कसरती अण्णा हजारे व त्यांच्या सहकारी जवानांना कराव्या लागल्या. त्या वेळी आजच्याएवढे संशोधन झालेले नव्हते. टाकीतील डिझेल बर्फासारखे गोठून जायचे. डिझेल टाकीखाली आग निर्माण करुन टाकी गरम करावी लागे, तर कधी पाइपलानमधील डिझेल गोठलेले असल्याने गरम करुन ते वितळावा लागे. अनेकदा उतारावर दीड-दोन किलोमीटर गाडी गिअरमध्ये हळूहळू गरम होऊन चालल्यावर ती सुरु होत असे. रात्री तंबूवर बर्फ जास्त पडला तर लगेच तो काढावा लागे. अन्यथा बर्फाच्या वजनाने तो दबण्याची शक्यता असे. हिमालयातील सिक्कीम, भूतान, मिझोराम, नागालँड, जम्मू-काश्मीर, सिमला, टापरी या भागात राहण्याचा योग अण्णा हजारे यांना आला. या काळात अनेक छोट्या-मोठ्या प्रसंगांना सामोरे जावे लागले.[१९]

### ३.३.८ युध्दभूमीवरील प्रसंग -

चीनने १९६२ मध्ये भारतावर आक्रमण केले होते. चीनबरोबर झालेल्या युध्दात अण्णा हजारे हे ही भारतीय लष्करातून लढले. या चीन - भारत युध्दात अण्णा हजारे यांना आणि भारतीय लष्कराला अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. अण्णा हजारे आणि त्यांच्या सहकारी जवानांपैकी जे जवान सुटीसाठी गेले होते, त्यांना ताबडतोब परत बोलावण्यात आले. 'ऑर्डर' आल्याबरोबर दोन तासांत निघावे लागेल,

असा सतर्कतेचा इशारा अण्णा हजारे व त्यांच्या सहकाऱ्यांना देण्यात आला. ४ डिसेंबर १९६५ रोजी संध्याकाळी सात वाजता कंपनीला 'मार्च' करण्याचे आदेश दिले. अवघ्या तासाभरात अण्णा हजारे यांच्या कंपनीतील सर्व गाड्या सज्ज झाल्या; पण कुठे जायचे हे काहीच माहीत नव्हते. रात्री आठच्या दरम्यान अण्णा हजारे यांच्या कंपनीच्या सुमारे दीडशे गाड्या सिमेच्या दिशेने निघाल्या. पहाटे अण्णा हजारे व त्यांची कंपनी सीमेनजीक पोचले. जवानांसाठी लागणारे अन्न - धान्य, दारुगोळा आदी साहित्य पोचविण्याचे काम अण्णा हजारे यांच्या विभागाकडे होते.

११ डिसेंबर १९६५ हा दिवस अण्णा हजारे यांच्या दृष्टीने कायम लक्षात राहणारा आहे. सीमेवर लढणाऱ्या जवानांसाठी आवश्यक असणारे सर्व साहित्य घेऊन अण्णा हजारे यांच्या कंपनीतील वीस - पंचवीस गाड्यांचा ताफा सीमेकडे निघाला, याची शत्रूला कशी चालूल लागली हे कंपनीतील कुणालाही समजले नाही. तीन विमाने अण्णा हजारे यांच्या व त्यांच्या सहकाऱ्यांच्या गाड्यांच्या ताफ्याला आडवी गेली. अण्णा हजारे व त्यांच्या सहकाऱ्यांना वाटले की, ही विमाने आपलीच आहेत. काही क्षणांत ही विमाने पुन्हा अण्णांच्या गाड्या हजारे यांच्या ताफ्याच्या मागील बाजूने आली आणि भारतीय गाड्यांच्या ताफ्यावर गोळीबार करत पुढे गेली. गोळीबाराचा आवाज होताच अण्णा हजारे यांनी स्टिअरिंगखाली बसून हताने गाडीचा ब्रेक दाबत असतानाच गाडी रस्त्याच्या कडेला असलेल्या टेलिफोनच्या खांबाला आदळली आणि थांबली. गाडीची गती कमी झालेली असल्याने गाडीचे अधिक नुकसान झाले नव्हते.

शत्रूची सर्व विमाने पुढे गेल्यावर अण्णांनी गाडीचा दरवाजा उघडला आणि स्वतःचा बचाव करण्यासाठी जागा शोधणार तोच, पुन्हा विमाने परत मागच्या बाजूने आली. अण्णा हजारे गाडीपासून

पंधरा फुटांवर पडून राहिले. अण्णा हजारे मृत झाले आहेत असे समजून पुन्हा गाड्यांवर गोळ्यांचा वर्षाव करीत विमाने पुढे गेली. पुन्हा विमाने येत नाहीत, याची खात्री झाल्यावर अण्णा हजारे उठले आणि पाहतात तर त्यांचे सर्व सहकारी जवान रक्ताच्या थारोळ्यात पडलेले होते. एकाचा हात, तर दुसऱ्याचा पाय तुटलेला होता. अण्णा हजारे यांच्या समोरच्या गाडीतील जवानांच्या पोटात गोळी घुसली होती. अण्णा हजारे यांच्या कपाळावर गोळीचा तुकडा लागला होता. कपाळातून रक्त येत होते. पण त्याचे भान अण्णा हजारे यांना राहिले नव्हते. सर्व जवान सहकारी शहीद झाले असले तरी जखमी असलेल्या तीन जवानांना कसे वाचवता येईल, हा अण्णा हजारे यांच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न होता. जवळच दोन किलोमीटरवर जिरा नावचे गाव होते. तेथे एक खाजगी डॉक्टरचा दवाखाना होता. या तीनही जवानांच्या जखमातून मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव होत होता. म्हणून अण्णांनी प्रथम त्या डॉक्टरकडून प्रथमोपचार करुन घेतले, त्यामुळे रक्तस्त्राव कमी झाला.

ज्या ठिकाणी अण्णा हजारे यांच्यावर व त्यांच्या सहकारी जवानांवर हवाई हल्ले झाले, त्या ठिकाणापासून सुमारे पंचाहत्तर किलोमीटरवर मिलिटरी हॉस्पिटल होते. एका गाडीतून अण्णा हजारे यांनी स्वतः ड्रायव्हिंग करुन तीनही जखमी जवानांना तेथे नेले. तीन डॉक्टारांनी निकराचा प्रयत्न करुनही एका जवानाचे निधन झाले, तर दोन जवान वाचले; मात्र ते कायमचे अपंग झाले. यानंतर हॉस्पिटलमधून ज्या ठिकानी गोळीबार झाला त्या ठिकाणी अण्णा हजारे पुन्हा आले. या घटनेची माहिती तोपर्यंत कंपनीपर्यंत पोचली होती. गोळीबारात शास्त्रीजी घायाळ झाले असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे, अशी चुकीची माहिती अण्णा हजारे यांच्या कंपनीपर्यंत पोचली. कंपनीतील सर्व जवान अण्णा हजारे यांना 'शास्त्रीजी'

नावाने ओळखत होते. कंपनीचे अधिकारी, काही जवान घटनास्थळी पोचले तेव्हा अण्णा हजारे हॉस्पिटलमधून घटनास्थळी पोचले होते. मला किरकोळ जखम झाल्याचे त्यांना अण्णांनी सांगितले.

अण्णा हजारे यांनी स्वत:च्या गाडीजवळ जाऊन पाहिले, तर चालकाच्या समोरच्या काचेवर तीन ठिकाणी गोळ्या लागल्या होत्या. स्टिअरिंगच्या खाली बसून हताने ब्रेक लावल्यामुळेच अण्णा हजारे बचावले. स्वामी विवेकनंदाच्या विचारांचा अण्णा हजारे यांच्या जीवनावर झालेला प्रभाव, सर्व सहकारी गेले आणि मीच वाचलो यामागे ईश्वराची काहीतरी इच्छा असावी, या विचाराने खेमकरण सीमेवर आपला हा पुनर्जन्म आहे आणि उर्वरित आयुष्य आता समाजसेवेसाठीच व्यतीत करायचे हे या वेळी अण्णा हजारे यांनी मनोमन ठरविले.

अण्णा हजारे यांच्या गाडीवर झालेल्या हवाई हल्ल्यानंतर पुढे पंधरा दिवस युध्द चालू होते. मरणाची भिती केव्हाच संपली होती. उलट शत्रूशी लढण्यासाठी नवा उत्साह, जोश निर्माण झ ाला होता. कारण अण्णा हजारे यांनी डोळ्यांनी मरण पाहिले होते. त्यामुळे आता मरणाची भीती उरली नव्हती. सीमेवर प्रत्यक्ष लढणाऱ्या जवानांसाठी लागणारी गोळाबारुद त्यांच्या जागेपर्यंत घेऊन जावे लागत असे. ते ही दिवसा नव्हे, तर रात्रीच्या वेळी घेऊन जावे लागे. छोट्याशा बॅटरीच्या आधाराने अंदाज घेत फायरिंग चाललेल्या ठिकाणी गोळा - बारुद देऊन रात्रीच परत फिरावे लागे. मात्र अण्णा हजारे कधी घाबरले नाहीत.[२०]

### ३.३.९ अमरनाथाचे दर्शन -

ठरावीक महिनाभराचा कालावधी सोडला तर अमरनाथाच्या डोंगरावर सतत अकरा महिने बर्फ असतो. यात्राकाळात बर्फ नसल्यानेच यात्रेकरु जात असतात. काश्मीरमधून अण्णा हजारे लष्करातून स्वेच्छा निवृत्त होणार असल्याने व अमरनाथाच्या दर्शनाची ओढ असल्याने एके दिवशी अण्णा हजारे कंपनीतून परवानगी घेऊन अमरनाथाच्या दर्शनाला निघाले. अण्णा हजारे यांच्या बरोबर त्यांच्या कंपनीतीलच एक जवान दर्शनाला निघाला. अमरनाथापासून आठ किलोमीटर अंतरावर जवानांना थांबण्यासाठी मिलिटरी कॅम्प होता. तेथे रात्री अण्णा हजारे यांनी मुक्काम केला. सकाळी सहा वाजता अण्णा हजारे यांचा पायी प्रवास सुरु झाला. सात किलोमीटर बर्फातून चालत जायचे होते. पायवाटेने चालताना, रस्ता पोकळ नाही, याची भाल्यासारख्या काठीने खातरजमा करुनच पुढे चालावे लागत असे. कधी कधी बर्फाखालून पाण्याचा प्रवाह वाहत असतो. हा प्रवाह लक्षात न आल्यास बर्फात माणूस पडतो व आतील पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहत जातो. अशा वेळी सदर व्यक्तीचा शोध घेणेही कठीण जाते.

अण्णा हजारे यांचा अमरनाथाच्या दिशेने प्रवास सुरु झाला. संपूर्ण रस्ता निर्मनुष्य होता. अंगावर काटे असणारे सायाळ प्राणी व मांजरीएवढ्या घुशी मात्र दिसत होत्या. दुपारी बाराच्या सुमारास अमरनाथ गुहेजवळ अण्णा हजारे पोचले. सर्वत्र बर्फ पडलेला होता. गुहेजवळच बर्फाच्या पाण्याचा प्रवाह होता. त्यात अण्णा हजारे यांनी स्नान केले. अमरनाथाचे दर्शन घेतले. बर्फाचे लिंग पाहून डोळ्यांचे पारणे फिटले. थोडा वेळ प्रार्थना केली. स्वतःसाठी किंवा कुटूंबातील लोकांसाठी काहीच मागितले नाही. कोणाचेही दुःख माझ्या दृष्टीस पडू देऊ नकोस, सर्वांना सदबुध्दी दे, एवढेच एकच मागणे आजपर्यंत अण्णा हजारे ईश्वराकडे मागत आहेत आणि हेच मागणे अमरनाथाला मागितले. समाजसेवा करण्यासाठी शक्ती दे, सद्बुध्दी दे | हे मागणे मागितले. बरोबर नेलेली शिदोरी संपवली आणि पुन्हा परतीच्या

प्रवासाला अण्णा हजारे निघाले. रात्री आठ वाजता कॅम्पमध्ये अण्णा हजारे सुखरुप पोहचले. अमरनाथाच्या दर्शनाने शारीरिक थकवा तर जाणवला नाहीच, उलट मानसिक समाधानात भर पडली. सहा वर्षे हिमालयाच्या बर्फात राहण्याचा योग अण्णा हजारे यांच्या जीवनात आला; मात्र चौदा किलोमीटर बर्फातून प्रवास करण्याचा पहिला प्रसंग अण्णा हजारे यांनी अनुभवला. तो निर्विघ्नपणे पार पडला. लष्करातील संघर्षमय जीवनातच अमरनाथाचे दर्शन अण्णा हजारे यांना घडले.[२१]

## ३.४ आत्मघाताचा विचार आणि समाजसेवेमागील प्रेरणा :

१९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युध्दात भारताची मोठी हानी झाली होती. मोठ्या संख्येने भारतीय जवानांना वीरगती प्राप्त झाली होती. सेनादलात युवकांची भरती सुरु झाली. अण्णा हजारे भूमिगत असताना सेनादलातील भरतीची माहिती मिळताच अण्णा हजारे यांनी सेनादलात भरती होण्याचे ठरवले. खरे तर सेनादलात भरती होण्याचे अण्णा हजारे यांचे ध्येय नव्हते. अण्णा हजारे यांची उंचीही योग्य नव्हती; परंतु भारत - चीन युध्दात जे काही घडलं त्याची खंत मनात होती. 'आपल्या मातृभूमीच्या सीमांच्या रक्षणासाठी युवकांनो, तुमची गरज आहे. भारतमाता तुम्हास साद घालत आहे,' असे आवाहन सेनादलात भरतीसाठी भारत सरकारने युवकांना केले होते. मातृभूमीच्या सेवेसाठी आपण धावून गेले पाहिजे या विचाराने भारावून अण्णा हजारे यांनी भरतीसाठी अर्ज केला. 'एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज' कडून अण्णा हजारे यांना बोलावणे आले. त्यानुसार अण्णा हजारे भरतीसाठी गेले. उंची, छाती व वजन नसतानाही योगायोगाने अण्णांची सेनादलात निवड झाली. सुरुवातीला दोन महिने मुंबईला बॉम्बे मोटार ड्रायव्हिंगमध्ये ट्रक आणि इतर गाड्या चालविण्याचे तांत्रिक प्रशिक्षण झाले. आरटीओची

ड्रायव्हिंग परीक्षा अण्णा हजारे उत्तीर्ण झाले. नंतर अण्णा हजारे यांच्या बॅचला बेसिक प्रशिक्षणासाठी औरंगाबादला पाठविण्यात आले. तेथे अण्णा हजारे यांना अवजड वाहने चालविण्याबरोबर गाड्यांच्या इंजिन व इतर सर्व स्पेअरपार्टची माहिती देण्यात आली. नादुरुस्त गाड्या दुरुस्त करण्याचे प्रशिक्षण अण्णा हजारे यांना देण्यात आले. सेनादलात प्रत्येक ड्रायव्हर हा स्वतः प्रशिक्षित फिटर असतो. तसे प्रशिक्षण अण्णा हजारे यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना देण्यात आले. तसेच बंदुका, स्टेनगन व लाईट मशिनगन चालविण्याचेही प्रशिक्षण देण्यात आले. रोज परेड व पी.टी. होतीच. वर्षभर हे सर्व प्रशिक्षण झ ााल्यावर अण्णा हजारे व त्यांच्या सहकाऱ्यांची आर्मी सप्लाय कोर (ए.एस.सी.एम.टी.) रेजिमेंटसाठी निवड झाली. शेवटची पासआर्डर परेड झाल्यावर अण्णा हजारे यांची कंपनी दिल्लीकडे रवाना झाली, तो दिवस १ जानेवारी १९६४ होता. दिल्लीतल्या कडाक्याच्या थंडीचा प्रथमच अण्णा हजारे यांनी अनुभव घेतला. थंडीने हाताची बोटे आखडली होती. शर्टाची बटने लावणे अवघड झाले. अण्णा हजारे एक महिना दिल्लीत राहिले. नवीन लष्करी ट्रक अण्णा हजारे व टीमच्या हवाली करण्यात आले. त्या गाड्या घेवून अण्णा हजारे यांची कंपनीसह पंजाबात अंबाला कॅम्पला आली. अंबालात कालका, नहान, सिमला, रामपूर, टापरी, शुगर सेक्टर या पहाडी भागात अवजड ट्रक चालविण्याचे प्रशिक्षण अण्णा हजारे यांना देण्यात आले. अंबाला, कालकामार्गे सिमला, टापरी, शुगर सेक्टर अशा अवघड नागमोडी वळणाच्या घाट रस्त्यावरुन गाड्या चालविण्याचे कौशल्य अण्णांणी संपादन केले. १४ ते १५ हजार फूट उंचीवरील हिमप्रदेशातही गाड्या चालविण्याचे प्रशिक्षण अण्णा हजारे यांनी घेतले. हा प्रशिक्षणाचा कार्यक्रम सहा महिने चालला. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर अंबालातून प्रत्यक्ष सरहद्दीवर रसद पोचविण्याचे काम अण्णा हजारे व त्यांच्या कंपनीला देण्यात आले. हे काम सतत दोन वर्षे चालू होते.

अण्णा हजारे यांनी वयाची २५ वर्षे पूर्ण केली होती. ते व त्यांचे सहकारी पहाटे उठल्यापासून रात्री दहा वाजेपर्यंत अविश्रांतपणे राबत असत. त्याच वेळी अण्णा हजारे यांच्या मनात विचारांचे वादळ उठले. आपण थंडीवाऱ्यात का राबतो? हे सर्व कशासाठी करतो? जीवनाचे रहस्य काय आहे? रोज पहाटे उठा, झोपेपर्यंत सतत धावपळ करा. अखेरच्या श्वासापर्यंत ही धावपळ चालू असते. कुणी पोटासाठी धावत असतो. धनिकांत आपल्या तिजोऱ्या भरण्याची स्पर्धाच लागलेली असते. माड्या - बंगले बांधले, गाड्या घेतल्या, संपत्तीच्या राशी रचल्या, तरी धनिकांची हाव हाव आणि खाव खाव थांबत नाही. शेवटीची इथेच सगळे सोडून माणसाला जावे लागते. जगज्जेता विश्वसम्राट सिकंदराला आपल्या मृत्यूची चाहूल लागली. त्या वेळी स्मशानभूमीवर नेताना माझे हात शवपेटीच्या बाहेर काढा, असे त्याने सांगितले. "मी जग जिंकले तरी सिकंदर धरतीवर रिकाम्या हाताने आला आणि रिकाम्या हाताने गेला हे जगाला कळू द्या. हा संदेश त्याने जगाला मिळाला." आपल्या ऋषी - मुनींनीही हाच संदेश दिलेला आहे; पण त्याकडे आपले दुर्लक्षझाले आहे आपण धनाच्या राशीवर लोळत जगण्यासाठी धडपडतो आहोत. जीवनाचा विचार करताना रोज भल्या पहाटे उठा, परेड करा. दिवस मावळेपर्यंत राबा, हे कशासाठी आपण करतोय ? रोज उठा, खा, संसाराचे दुकान मांडा, ते चालवीत चालवीत एक दिवस मरुन जा. एवढ्याच साठी जीवन आहे का? हे जग ईश्वराने कशासाठी निर्माण केले? मानसाच्या जीवनाचे ध्येय काय? आदी जीवनाविषयीच्या प्रश्नांनी अण्णा हजारे यांच्या मनात वादळ निर्माण होत असे.

रात्रीचे स्वप्न आणि आयुष्याचे स्वप्न यात काय फरक आहे? आपण सुवर्ण सिंहासनावर विराजमान झालो आहोत. राजा झालो आहोत. प्रजेने हत्तीवरील अंबारीतून शाही मिरवणूक काढली आहे. सर्वत्र आपला जयजयकार होतो आहे...। असे स्वप्न कुणा गरीब माणसाला पडले. स्वप्नभंग होताच

जाग येते आणि फाटक्या गोधडीतून एक पाय बाहेर आलेला असतो. अशाप्रकारे स्वप्न आणि जीवन यात काय फरक आहे? शरीरातील चेतना निघून गेली, की सर्व जाग्यावर राहते आणि देह मातीला मिळतो. पंचमहाभूते पंचमहाभूतांमध्ये विलीन होतात. कोट्यवधी वर्षांपासून हे जीवनाचे रहाटगाडे चालू आहे. दोनशे - तीनशे वर्षांपूर्वी आपल्या परिवाराची स्थापना करणाऱ्याचेही नाव आपणास आठवत नाही; मग माझं माझं करीत जगायचे कशासाठी? याचे उत्तर शोधण्याचा अण्णा हजारे यांनी खूप प्रयत्न केला; पण अण्णा हजारे यांना समाधानकारक उत्तर मिळाले नाही. त्यामुळे कधीतरी मरायचेच आहे तर परिश्रम करीत का जगायचे? त्यापेक्षा कष्ट, चिंता व ताणतणावातून मुक्तीसाठी नैसर्गिक मृत्यूची वाट न पाहता लवकर मृत्यूला स्वीकारायचे अण्णा हजारे यांनी ठरविले. कोणत्याही वेदना सहन न करता लवकर मृत्यू येण्यासाठी धावत्या रेल्वेपूढे उडी मारण्यास अण्णा हजारे एका दिवशी सिध्द झाले. ते दिल्ली स्टेशन होते. गाड्या सारख्या ये-जा करत होत्या. एका कमी गर्दी असलेल्या रिकाम्या प्लॅटफॉर्मवर गाडीची वाट पाहत विषण्ण मनाने अण्णा हजारे फेऱ्या मारत होते. अण्णांच्या खिशात आत्महत्येबाबतचे सविस्तर पत्र होते. फिरता फिरता अण्णा हजारे यांचे सहजपणे लक्ष एका बुकस्टॉलवर गेले. बुकस्टॉलमधील स्वामी विवेकानंदांचे चित्र असलेल्या पुस्तकाने अण्णा हजारे यांचे लक्ष वेधून घेतले. ते पुस्तक अण्णा हजारे यांनी विकत घेतले. गाडी येण्याची वाट पाहत बाकड्यावर अण्णा हजारे पुस्तक वाचन करत बसले. अण्णा हजारे जसजसे पुस्तक वाचन करत होते तसतसे त्यांचे मन समाधान पावत गेले. पुस्तक वाचताना वेळेचे भान अण्णा हजारे यांना राहिले नाही. गाडी प्लॅटफार्मवर येऊन उभी राहिली, तेही अण्णा हजारे यांना समजले नाही, कळाले नाही. इतके ते एकाग्र झाले होते. गाडी पुढच्या प्रवासाला गेली तरी अण्णा हजारे ते पुस्तक वाचतच होते. एकाच बैठकीतच ते पुस्तक अण्णा हजारे यांनी वाचून काढले. त्या

पुस्तकात जीवनाचा अर्थ त्यांना सापडला. आत्महत्येचा विचार त्यांच्या मनातून निघून गेला. दिल्लीहून अण्णा हजारे अंबाला येथे ड्यूटीवर हजर झाले.[२२]

### ३.४.१ स्वामी विवेकानंदांच्या विचारातून अण्णा हजारे जीवनात नवे परिवर्तन :

सेनादलाची चाकरी बजावत असताना स्वामी विवेकानंदांची अनेक पुस्तके अण्णा हजारे यांनी मिळविली. ती अण्णांनी मन लावून वाचली. माणसाला लाभलेले जीवन हे सेवेसाठी आहे, याचा साक्षात्कार अण्णा हजारे यांना विवेकानंदांच्या विचारातून झाला. मानसाचा देह हा पंचमहाभूतांचा बनलेला एक हाडामांसांचा सापळा आहे. त्यातून चैतन्यरुपी ईश्वरी उर्जा वाहते, म्हणून तो चैतन्यशील आहे. म्हणून मानवी शरीर गतिमान आहे. वीजप्रवाहामुळे दिवा प्रकाशमान होतो. वीज नसेल तर दिव्याचा काही उपयोग नाही. त्याचप्रमाणे ईश्वरी चेतनेमुळे शरीराला महत्त्व आहे. ती चेतना निघून गेल्यावर शरीर अचेतन होते. चैतन्यशील देहावर आपण जेवढे प्रेम करतो, माया करतो, तेवढी अचेतन देहावर करीत नाही. कितीही प्रिय असला तरी अचेतन देह घरात जिवापाड जपून ठेवीत नाही. बारा तासही घरात ठेवत नाही. या चेतनशक्तीलाच आपण आत्मा म्हणतो. आत्मकल्याणासाठी मनुष्यजन्म लाभलेला आहे. सेवेतूनच आत्मकल्याण साध्य होते. तेच खरे अध्यात्म आहे, हे विचार अण्णांना स्वामी विवेकानंदांच्या पुस्तकातून मिळाले.

एका पुस्तकात स्वामी विवेकानंद म्हणतात, “ज्याचेजवळ मातेचे कोमल हृदय आहे तोच खरा माणूस. आपल्याभोवताली असलेल्या लक्षावधी जीवांबद्दल तुम्हास करुणा वाटली पाहिजे. तसेच तुम्ही आज्ञाधारक असले पाहिजे. तुम्हावर सोपविलेले काम तुम्ही प्राण ओतून प्रामाणिकपणे केले पाहिजे.

शील, बुध्दिमत्ता, सर्वस्व त्याग, नम्रता, आज्ञापालन या गुणांचा संगम असलेल्या कार्यकर्त्यांची आज देशाला गरज आहे. आपल्या वाटेला आलेल्या जीवनाबद्दल व लहानसहान गोष्टींबद्दल जो सतत कुरुकुरु करतो, सतत तक्रारी करतो, त्याचे जीवन अपयशी होते. फुकट वाया जाते. असा निराश माणूस आत्मघाताचा मार्ग स्वीकारतो. हा भ्याडपणा आहे. ईश्वराने दिलेले जीवन संपविण्याचा अधिकार तुम्हास नाही. ईश्वराने तुम्हास सेवेसाठी निर्मिले आहे. ती सेवा करीत जा. कोणतीही सेवा क्षुद्र नाही. आपल्या वाटेला आलेले काम श्रमातून सिध्दीस न्या. क्षुद्र, नावडते काम आपल्या श्रमातून जो आवडते बनवितो तोच खरा बुध्दिमान. मनपसंत सोपी कामे तर महामूर्ख देखील करीत असतात. जगात कोणतेही काम क्षुद्र नाही. जगातली प्रत्येक वस्तू वटवृक्षाच्या बीजासारखी आहे. त्या प्रत्येक बीजात महाप्रचंड वटवृक्ष सुप्तावस्थेत असतो, हे समजून जो सेवा करतो तो मोठे काम करुन दाखवतो. आपली सेवा आणि काम करीत राहणे यातच खरा मोक्ष आहे. चांगल्या विचाराने सत्कृत्य करणाऱ्याच्या मागे सहस्त्र देवदूतांचे बळ उभे राहते. तुम्ही सतत कार्यमग्न राहा. सेवाकार्यात ज्याला एकांत व शांतता लाभते, तोच खरा आदर्श पुरुष होय. खरा कर्मयोगी हा गुहेतल्या योग्यासारखा शांत असतो. सेवेतून असा लाभ होतो. जीवन सार्थकी लागते, मात्र कीर्ती आणि संपत्तीसाठी स्वतःला कधी विकू नका. प्रसिध्दीतून मिळणारी कीर्ती आणि मोठेपण अल्पायुषी असते. सेवाकामातून मिळालेले मोठेपण चिरंतन टिकते. सेवाकाम करताना तुम्ही हवेप्रमाणे स्वतंत्र आणि लतेप्रमाणे विनम्र व्हा. श्वासासारखे आज्ञाधारक बना. सत्यवादी बना. परमेश्वर सत्यसंकल्पाचा पाठीराखा आहे. असेच नम्र सत्यवादी, आज्ञाधारक व निष्काम सेवाभावी कार्यकर्ते समाजसेवेतून देशाचे उज्ज्वल भविष्य घडवितात.”

विवेकानंदांच्या वरील विचारांचा अण्णा हजारे यांच्या जीवनावर खोलवर परिणाम झाला आणि या विचारांनी अण्णा हजारे यांच्या जीवनात आमुलाग्र परिवर्तन घडविले, दृष्टी दिली. प्रत्येक माणसाला अधिकाधिक सुख आणि आनंद हवा असतो. आपण निरंतरपणे सुखासमाधानात जगावे, जीवन सदैव आनंदी असावे. कणभरही दु:ख आपल्या वाट्याला येऊ नये असे माणसाला वाटत असते. सुखाचा पाठलाग करत करत व्यक्ती आनंदाचा शोध घेत असतो; पण त्याला अखंड आनंदाचा झरा काही सापडत नाही. तरी त्याचा सतत बाहेर आनंद शोध चालू असतो. कुणाला वातानुकूलित बंगल्यात राहण्यात आनंद वाटतो, कुणाला सत्ता गाजविण्यात आनंद वाटतो, कुणाकुणाला सर्व प्रकारच्या भोगांत आनंद वाटतो, तर काहींना धनाच्या राशी रचून सात पीढ्यांची सोय करण्यात आनंद वाटतो, अनेक मार्गांने माणुस बाह्य आनंद मिळवीत असतो. हा आनंद क्षनभंगुर आहे. तो शाश्वत नाही. म्हणून वातानुकूलित बंगल्यात राहणाऱ्यांना निद्रादेवीला प्रसन्न करण्यासाठी झोपेच्या गोळ्या घ्याव्या लागतात. बाह्य आनंदात सुख वाटत असले तरी त्याचा शेवट दु:खात होतो. अशा भौतिक सुखाच्या आनंदामागे दु:ख लपलेले असते. नवीन गाडी घेतली, फ्रीज घेतला, टी.व्ही. घेतला, की आनंद वाटतो बिघडला, की दु:ख होते.

या विश्वातील प्रत्येक दृश्यवस्तूचा विनाश अटळ आहे. अशा वस्तूच्या उपभोगातून मिळणारा आनंदही क्षणिक आहे. आपले संत पडक्या घरात राहत होते. ते 'एसी'मध्ये राहत नव्हते. त्यांच्या घरात ऊनपाऊस हजेरी लावायचा; परंतु त्यांनी बाह्यसुखात आनंद शोधला नाही, तर आत्मानंदाचा त्यांनी शोध घेतला होता. म्हणून 'आनंदाचे डोई आनंद तरंग' असे तुकारामांनी आपल्या अभंगात म्हटले आहे. त्यांना आतला शाश्वत आनंदाचा झरा सापडला होता; म्हणून त्यांचं तनमन आनंदमय झालं होतं.

आपल्यासारख्या सामान्य माणसाला सेवेतून या आनंदरुपी झऱ्याचा लाभ होऊ शकतो, असे अण्णा हजारे म्हणतात.

जीवन कधी ना कधी संपणारच आहे, तर खाऊनपिऊन मजा करुन घ्या अशी जगातील बहुसंख्य माणसांची आज विचारधारा बनलेली आहे. त्यामुळे समाजात चंगळवाद फोफावला आहे. माणूस जिभेचे चोचले पुरविण्यासाठी काहीही खाऊ-पिऊ लागतो. त्याची भोगलालसा आणि चैनबाजी वाढते. अखेर त्याचा शेवट दु:खात होतो. खायचे आणि प्यायचे आणि एक दिवस मरुन जायचे; एवढ्याच साठी मानवी जीवन नाही. मग जनावरात आणि माणसात फरक तो काय! गळ्यात तुळशीच्या माळा घातल्या, कपाळाला गंध लावला आणि तीर्थस्थानाच्या वाऱ्या केल्या म्हणजे कुणी माणूस धार्मिक बनत नाही. घरात धातूंच्या मूर्ती व मंदिरात पाषाणमूर्तीची तासन्तास पुजा करीत बसणे म्हणजे तो महान देवभक्त होणे असे नाही. ती ईश्वरसेवा मूळीच नाही, असे अण्णा हजारे म्हणतात. मनुष्यप्राणी आणि इतर प्रत्येक प्राण्याच्या ह्रदयात चैतन्यरुपी इश्वराचा निवास आहे. त्याबाबतची एक कथा आहे. माणूस आपल्या लोभासाठी ईश्वराच्या मागे लागला. देवा मला धन दे, मला आमदार कर, खासदार कर, मंत्री कर, मुख्यमंत्री कर, माझ्या सात पिढ्यांची सोय कर...। अशा मागण्या वाढत होत्या. एक मागणी पूर्ण झाली, की तो माणूस दुसरी मागणी पुढे करायचा. त्या माणसाच्या हावरटपणाला व मागण्याना देव कंटाळला. माणसाच्या जाचातून सुटका करुन घेण्याचा उपाय देवाने शोधला. तो समुद्राच्या तळाशी जाऊन लपला; परंतू माणूस तिथेही हजर झाला. नंतर देव आकाशात लपला. तिथंही माणसाने देवाचा पिच्छा पुरविला. शेवटी देव कैलास पर्वतावर जाऊन बसला. लोभी माणसाने कैलासावर देवाला गाठलं. देव जाईल तेथे

माणूस हजर यामुळे देव वैतागला. माणसाला माझा शोध घेता येणार नाही असे ठिकाण सांगण्याची विनंती देवाने नारदाला देवाला केली.

माणसाच्या हृदयात जाऊन लपण्याचा सल्ला नारदाने देवाला दिला. देवाने तो मानला, तेव्हापासून माणूस देवाचा बाहेर शोध घेतो आहे. देव मात्र शांतपणे त्याच्या हृदयात पहुडला आहे.

त्या हृदयास्थ ईश्वराची सेवा माणूस विसरला. बाह्य पोपटपंची पूजेत अडकला. आपल्या ऋषीमुनींनी व साधुसंतांनी हृदयस्थ ईश्वराचा शोध घेतला आहे. मानवसेवा हीच इश्वरसेवा असल्याचे सांगितले आहे; परंतु त्याकडे दुर्लक्ष करुन माणूस मंदिरात, मशिदीत व चर्चमध्ये देवाला शोधतो आहे. मायेच्या बाजारात गरगर फिरतो आहे. मंदिरात आपण मुर्तीसमोर हात जोडतो. ते जोडलेले हात आपल्या छातीशी हृदयाजवळ असतात म्हणून मूर्तीही हृदयातील ईश्वराशी ओळख होण्याचे प्रतीक आहे. मूर्तिपूजा करावी; परंतु मानवसेवाही करावी. मूर्तिपूजेपेक्षा मानवसेवा ही ईश्वराची सत्यसेवा आहे, असे अण्णा हजारे म्हणतात.

जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले |

तोचि साधु ओळखावा, देव तेथेचि जाणावा ||

हा मानवसेवेचा संदेश संत तुकाराम यांनी दिला. तुम्हास सुख हवे असेल तर इतरांना सुखी करा. तोच शाश्वत आनंदाचा ठेवा आहे, असे साधू वासवानींनी म्हटले आहे. तुम्हाला ईश्वर हवा असेल तर दरिद्रीनारायणाची सेवा करा. दरिद्रीनारायणाच्या रुपात तो प्रकट झाला आहे.  जनसेवा हीच ईश्वरसेवा आहे. हा स्वामी विवेकानंदाचा संदेश आहे. या संदेशातूनच अण्णा हजारे यांना त्यांच्या जीवनाचे कोडे उलगडले. त्यांच्या मनावर त्याचा खोल परिणाम झाला आणि जीवनात नव्या क्रांतीचा उदय झाला.[२३]

### ३.४.२ सेनादलातील एका तपाची साधना :

मातृभूमीच्या रक्षणासाठी सेनादलात एक तप अण्णा हजारे यांनी सेवा चाकरी केली. या सेवेत जीवावरील अनेक प्रसंग आणि अनुभव अण्णा हजारे आले. त्यातून खूप काही शिकायला मिळाले. पाहायला मिळाले. १९६५ मध्ये भारत-पाकिस्तान युध्द सुरु झाले. लाहोर सेक्टरमधील खेमकरण भागात घनघोर युध्द चालू होते. समोरासमोर लढाई चालू होती. प्रतिस्पर्ध्याचे क्षेत्र काबीज करुन रस्ते, पूल, इंधन व अन्नधान्याचे साठे उद्‌ध्वस्त करण्याचे डावपेच दोन्ही सैन्यांकडून आखली जात होती. भारतीय सैन्याला पेट्रोलजन्य इंधन व धान्यसाठा रसद पुरविण्याची जबाबदारी अण्णांच्या कंपनीकडे होती. त्यानुसार रसद भरलेल्या २५-३० गाड्यांचा ताफा खेमकरण सीमेकडे आगेकूच करीत होता. ताफ्यांच्या सर्वांत पुढे अण्णा हजारे यांचा ट्रक होता. मैदानी भागातून अण्णा हजारे व त्यांची कंपनी संथपणे एकसाथ वाटचाल करत होती. त्याच वेळी अचानक पाकिस्तानची दोन सेबरजेट विमाने अवतीर्ण झाली. त्यांनी एअर फायर करुन अण्णा हजारे व त्यांच्या कंपनीवर हल्ला केला. गोळ्यांचा मारा चुकविण्यासाठी अण्णा हजारे स्टिअरिंगखाली बसले. एका हताने स्टिअरिंग व एका हाताने ब्रेकचा पॅडल दाबत होते. संथगतीने गाडी पुढे जाऊन रस्त्याच्या कडेला एका विजेच्या खांबावर धडकून थांबली. ट्रकच्या केबिनमधून पटकन खाली उडी मारुन अण्णा हजारे जमिनीवर साष्टांग नमस्काराच्या अवस्थेत पडून राहीले. पाकिस्तानी विमाने निघून गेली. नंतर अण्णा हजारे उठले व त्यांनी नंतर सर्व ताफ्यांची पाहणी केली. मागच्या गाडीतील अधिकांश जवान देवाङारी गेले होते. अण्णा हजारे यांच्या लष्करी वाहनात २५-३० गोळ्या घुसल्या होत्या. सुदैवाने इंजिन व पेट्रोलची टाकी सुरक्षित होती; मात्र गाडीचे पुढचे टायर गोळ्या घुसून निकामी झ

ाले होते. पुढच्या काचेतून आत गोळ्या आल्या होत्या. खाली वाकल्याने अण्णांच्या कपाळाला गोळीने छोटीशी जखम झाली होती; परंतू अण्णांच्या शेजारी बसलेले त्यांचे साथीदारे जायबंदी झाले.

सारे दृश्य अतिशय हृदयद्रावक होते. हृदयात दु:ख आणि वेदनांचा वणवा पसरला होता, असे अण्णा हजारे म्हणतात. ताफ्यातले मागचे पुढचे जवान देशसेवा करता करता धारातीर्थी पडले होते. अण्णा हजारे यांना सहिसलामत जीवनदान मिळाले होते. हे मिळालेले जीवन म्हणजे आपला पुनर्जन्म आहे. त्या जीवनावर आता आपला कोणताही हक्क नाही. ते जीवन समाजाचे आहे. समाजासाठीच ते अर्पण करावयाचे आणि स्वामी विवेकानंदांच्या विचारानुसार समाजाची निष्काम सेवा अखेरच्या श्वासापर्यंत करायची, असा निश्चय अण्णांनी केला. संसाराचे दुकान चालवण्यात वेळ जाईल; म्हणून स्वत:चा संसार मांडायचा नाही. विवाह करायचा नाही अविवाहित राहून इतरांच्या संसारात सुख - आनंद निर्माण करायचा अशी प्रतिज्ञा अण्णा हजारे यांनी केली. तो दिवस होता ११ डिसेंबर १९६५. त्या दिवसाने अण्णा हजारे यांना मृत्यूचे दर्शन घडविले; परंतु तो प्रसन्न झाला नाही. तेव्हापासून मरणाची भीती मनातून हद्दपार झाली असे अण्णा हजारे म्हणतात.

सेनादलातील बारा वर्षांच्या सेवेत शिस्त आणि नियमांचे उल्लंघन अण्णा हजारे यांनी कधीच केले नाही; मात्र अन्याय आणि असत्य सहन केले नाही. त्यांनी सत्याची कास धरुन जवानांवर होणाऱ्या अन्यायांविरुध्द सातत्याने लढा दिला. तो लढा अण्णांनी सत्याच्या जोरावर यशस्वी केला. पूर्वी जनतेच्या अडीअडचणी अन्याय दूर करण्यासाठी व जनप्रियतेसाठी दरबार भरविले जायचे. मोगल काळातही ही पध्दत होती, तीच परंपरा सेनादलातही चालू आहे. कंपनी असो अगर बटालियन असो, दर दोन महिन्यांनी सेनादलात सर्व जवानांसह दरबार भरविला जायचा. या दरबारात वरिष्ठ लष्करी अधिकारी

उपस्थित असत. आपल्या कंपनीतील अडीअडचणी दरबारात मांडावयास अधिकारी जवानांना सांगत. या दरबारात अधिकाऱ्यापुढे बोलायचे धाडस जवान सहसा करीत नसत. ते धाडस अण्णा हजारे सतत करीत आले. वैयक्तिक अडचणी दरबारात अण्णा हजारे यांनी कधीच मांडल्या नाहीत. जवानांच्या हिताच्या सामुदायिक अडचणी अण्णा हजारे यांनी दरबारात मांडल्या. जवानांच्या खाणावळी सडलेली फळे, भाजीपाला यायचा पुरवठादाराला मात्र भाव चांगल्या मालाचा दिला जायचा; असे का? हा प्रश्न अण्णा हजारे यांनी एकदा मांडला. त्या अधिकाऱ्याचे व पुरवठादाराचे सोटेलोटे असल्याने तो अधिकारी खूप चिडला. त्याने अण्णा हजारे यांचा अपमान केला. कोर्टमार्शल करण्याची भाषा वापरली. ते अण्णांना सहन झाले नाही. तीन सिंह आणि त्याखाली लिहिलेले 'सत्यमेव जयते' हे आपल्या देशाचे राष्ट्रीय मानचिन्ह आहे. आपण तेच सत्य बोललो, त्यात आपणास राग येण्यासारखे कारण नाही. उलट आपण सत्याचे स्वागत केले पाहिजे असे सडेतोड उत्तर अण्णांनी दिले. वेळप्रसंगी जवानांना लढायचे असते. त्यासाठी तो सदैव धडधाकट व आरोग्यसंपन्न हवा. सडका भाजीपाला खाऊन उद्या जवान आजारी पडले तर त्याला जबाबदार कोण? असा प्रश्न अण्णांनी उपस्थित केला. या प्रश्नांने अधिकारी अधिकच चिडला. सत्य तुम्हास मान्य नसेल तर मला सेनादलात राहायचे नाही. पोटार्थी नोकरी म्हणून नव्हे तर देशसेवा म्हणून सैनिकाचा पेशा मी स्वीकारला आहे, असे म्हणत मिलिटरी गणवेश अण्णा अंगावरुन उतरु लागले. त्यावेळी इतर अधिकाऱ्यांनी सांगितले, "या खतरनाक जवानाच्या नादी लागू नका, जीव गेला तरी तो सत्य सोडणार नाही." त्या मुळे तो लेफ्टनंट कर्नल गप्प झाला.

एकदा जवानांवरील रजेचा अन्याय दूर करण्यासाठी कमांडर कर्नल साहेबांच्या विरोधात अण्णा हजारे यांना लढा द्यावा लागला. कर्नलच्या हटवादीपणाविरुध्द लेफ्टनंट जनरलकडे तक्रार करण्याचे

धाडस अण्णा हजारे यांनी केले. त्यांनी अण्णा हजारे यांची कैफियत मान्य केली. त्याने बटालियनमधील सर्व जवानांना फायदा झाला. देशसेवेच्या भावनेने अण्णा हजारे सेनादलात भरती झाले होते. तसेच लहान वयातच अन्यायाविरुध्द संघर्ष करण्याचे संस्कार आईकडून आले होते. त्यामुळे त्यांचा स्वभाव धाडसी बनला होता. सेनादलात असताना संङार्षाचे अनेक प्रसंग आले. सेनादलातील बारा वर्षांच्या कारकिर्दीत जवानांच्या हितासाठी अकरा बड्या लष्करी अधिकाऱ्यांशी अण्णा हजारे यांना संघर्ष करावा लागला. त्यांची बाजू सत्य असल्याने त्यात त्यांना यश मिळाले.

आसाम, अरुणाचल प्रदेश, सिक्कीम, मिझोराम, पश्चिम बंगाल, नागालँड, काश्मीर या दुर्गम क्षेत्रात राहून देशसेवा करण्याची संधी अण्णा हजारे यांना मिळाली. अरुणाचलमधील तेजपूर, तवांग, धवांग या भागातील भौगोलिक रचना-निसर्गवैभव, समाजजीवन, त्यांची राहणी व वेशभूषा, त्यांचे सामाजिक व सांस्कृतिक उत्सव यांचे दर्शन अण्णा हजारे यांना घडले.

अरुणाचलचा बराचसा भाग आता चीनने गिळंकृत केला आहे. पश्चिम बंगालमधील सिलिगुडी, सिक्कीमच्या पुढील चीन सीमेवरचा प्रदेश, मिझोराम, नागालँड या दुर्गम व प्रतिकूल वातावरण असलेल्या प्रदेशात पाच वर्षे अण्णा हजारे यांनी काम केले. नंतर काश्मीर खोऱ्यातील लेह, लडाख क्षेत्रात त्यांनी काम केले. तेथील हिमप्रदेश, त्यातून उगम पावणाऱ्या पवित्र नद्या, आणि वन्यजीव पाहून अण्णांचे तनमन मोहरुन जायचे. बारा वर्षांच्या सेवेपैकी पाच वर्षे हिमालयाच्या सान्निध्यात अण्णा हजारे होते. हिमालयाने अनेक वेळा अण्णा हजारे यांना मृत्यूचे दर्शन घडविले. मिझोराम राज्यात अण्णा हजारे यांच्या कंपनीचे ट्रक चालले असताना मिझो अतिरेक्यांनी ट्रकगाड्या उडविण्यासाठी सापळा लावला होता. अण्णा हजारे चालवत असलेल्या ट्रकवर तर थेट गोळीबार झाला. त्यातूनही ते सहीसलामत

वाचले. काश्मीर खोऱ्यात ट्रक चालविणे म्हणजे मृत्यूशी सामना करण्यासारखे असते. हिवाळा ऋतूमध्ये रस्ता बर्फाखाली झाकला गेला होता. त्यावरुन ट्रक चालवत असताना घसरुन उलटा झाला; पण अण्णा हजारे यांना खरचटण्यापलीकडे दुखापत झाली नाही. एकदा अण्णा हजारे व त्यांचा एक सहकारी जवान ऐझवालहून ब्रह्मदेशच्या लुंगताई या सिमाभागात चालले होते. मार्गात डोंगरातून वाहणारा एक शुभ्र पाण्याचा झरा दिसला. अण्णा हजारे यांचा साथीदार त्या झऱ्याखाली आंघोळीसाठी थांबला. अण्णा हजारे पुढे निझाले त्याच वेळी त्या साथीदाराला त्याच्या हत्यारासहीत अतिरेक्यांनी पळवून नेले. पुढे गेल्याने अतिरेक्यांच्या तावडीतून अण्णा हजारे बचावले. मृत्यू झिरट्या घालत असताना प्रत्येक वेळी परमेश्वराने अण्णा हजारे यांना वाचवले. त्यामगे परमेश्वराचा काय हेतू होता हे तेव्हा समजले नाही. आज त्याचे त्यांना आकलन होत आहे.

रजा काढून अण्णा हजारे अधून मधून घरी यायचे. त्यावेळी अण्णा हजारे यांचे थोरले असल्याने अण्णा हजारे यांच्या लग्नाच्या विषयाची घरात चर्चा व्हायची. मुलगी पाहण्याचा कार्यक्रम आखला जायचा. त्या वेळी मला लग्न करायचे नाही. मी माझे सारे जीवन दीनदुबळयांच्या सेवेसाठी अर्पण करुन टाकले आहे. सेना दलातून निवृत्त झाल्यावर तेच माझ्या जीवनाचे ध्येय आहे. माझ्यासाठी बहिणींचे लग्न थांबवू नका, त्यांचे लग्न लावा असे आईला ते निक्षून सांगत.

समाजकार्य करु इच्छिणारा कार्यकर्ता आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी पाहिजे. त्याच्या उदरनिर्वाहाचा भार इतरावर पडता कामा नये. त्यासाठी मुदतपूर्व सेवानिवृत्ती अण्णा हजारे यांनी पत्करली नाही. १९७५ साली सेनादलातून अण्णा हजारे निवृत्त झाले आणि राळेगणसिध्दीला आले. 'जय जवान' कडून 'जय किसान' मार्ग स्वीकारला.[२४]

## ३.५ अण्णा हजारे यांच्या कार्याचा गौरव, त्यांना मिळालेले विविध पुरस्कार :

सैन्यातून निवृत्त झाल्यानंतर अण्णा हजारे पारनेर तालुक्यातील राळेगणसिध्दी या आपल्या मूळ गावी परत आले. नंतर आळंदीस गेले. तेथे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीवर तुळशीची माळ ठेवून गळ्यात घातली आणि संत ज्ञानेश्वर माऊलींना मनोभावे सांगितले, "ही माझ्या गळ्यात तुळशीची माळ नव्हे तर माझ्या देहावरचे तुळशीपत्र आहे. आजपासून हा देह माझा नव्हे तर समाजाचा आहे. नंतर अण्णा हजारे राळेगणसिध्दी (ता. पारनेर) येथे आले आणि तेथून त्यांनी सामाजिक कार्याला आपल्या जीवनात प्रारंभ केला. प्रथम गावाचा विकास, सुधारणा त्यांनी हाती घेतली.

जनसेवा हीच ईश्वर सेवा माणून अण्णा हजारे सदैव समाजसेवेत व्यस्त राहिले. वेगवेगळ्या कार्यांत योगदान देऊन पूर्वी राळेगणसिध्दी या हातभट्टी विकण्यासाठी प्रसिध्द असणाऱ्या गावाला एक आदर्श गाव बनविले. राळेगणसिध्दी (ता.पारनेर) हे गाव आज भारतातील एक आदर्श गाव बनले आहे. नसबंदी, नशाबंदी, चराईबंदी, कुऱ्हाडबंदी अशा वेगवेगळ्या संकल्पना त्यांनी राळेगणसिध्दीमध्ये राबवल्या व आजही त्याचे काटेकोरपणे पालन होत आहे. पाणलोट क्षेत्र विकास, माहितीचा अधिकार, भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन यांसारखे कार्य आदी वेगवेगळ्या प्रश्नांवर त्यांनी समाजकार्य केले व त्यातून जनहितार्थ या माध्यमातून वेगवेगळ्या योजना राबवल्या. जनतेच्या हितासाठी कधी कधी सरकारशी अण्णांनी संघर्ष केला; पण तो महात्मा गांधींप्रणीत चळवळीप्रमाणे अहिंसक होता. सरकारशी पत्रव्यवहार, अहींसात्मक आंदोलन, उपोषण आदी मार्गांने सरकारला जनहितार्थ निर्णय घेण्यास भाग पाडले.

अण्णा हजारे यांच्या या कार्याची दखल सरकारला घ्यावी लागली. त्याचप्रमाणे संस्था संघटनांना देखील घ्यावी लागली. अण्णा हजारे यांनी जे समाजसेवेचे कार्य केले, त्याबद्दल वेगवेगळ्या संस्था, संघटना आणि सरकार तर्फे त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना काही पुरस्कार देऊन त्यांना गौरवण्यात, सन्मानित करण्यात आले.

**अण्णा हजारे यांना खालील पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले :**

- **पद्मश्री**

भारताचे तत्कालीन राष्ट्रपती आर. वेंकटरमण यांच्या हस्ते २४ मार्च १९९० रोजी दिल्ली येथे पद्मश्री पुरस्कार अण्णा हजारे यांना त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल प्रदान करण्यात आला.

- **पद्मभूषण**

भारताचे तत्कालीन राष्ट्रपती आर. वेंकटरमण यांच्या हस्ते ६ एप्रिल १९९२ रोजी दिल्ली येथे अण्णा हजारे यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सामाजिक कार्याबद्दल त्यांना पद्मभूषण हा पुरस्कार बहाल करण्यात आला.

- केंद्र सरकारचा **प्रियदर्शिनी वृक्षमित्र** पुरस्कार.
- **मॅन ऑफ द इअर अ‍ॅवॉर्ड (१९८८)**
- राज्य सरकारचा **कृषिभूषण पुरस्कार (१९८९)**
- **यंग इंडिया अ‍ॅवॉर्ड**

- आशिया मानवशक्ती विकास संस्थेतर्फे **‘स्वामी विवेकानंद पुरस्कार (१९९५)’**
- चेन्नई येथील भगवान महावीर फाउंडेशनचा **महावीर ॲवॉर्ड** (१९९७)
- दिल्ली येथील रोटरी ॲवॉर्डस फॉर सर्व्हिस टू ह्युमॅनिटी (इंडिया) ट्रस्टचा **‘रोटरी मानवसेवा पुरस्कार १९९८’**
- ‘केअर’ या वॉशिंग्टन येथील आंतरराष्ट्रीय विकास व साह्य संस्थेतर्फे मानवतावादी कार्याबद्दल सन्मान (१९९८)
- **इंटरनॅशनल ट्रान्सपरन्सी ॲवॉर्ड** (दक्षिण कोरिया-सेऊल)
- **पॉल मित्तल नॅशनल ॲवॉर्ड २०००** (नेहरु सिध्दांत केंडर ट्रस्ट लुधियाना)

  पंजाबचे मंत्री श्री. बलरामजीदास टंडन यांच्या हस्ते १४ नोव्हेंबर २००० रोजी प्रदान करण्यात आला.
- **डॉक्टरेट पदवी** गांधीग्राम रुरल इन्स्टिट्यूट डीम्ड युनिव्हर्सिटी डिंडिगुल तामिलनाडू ८ नोव्हेंबर २००५.
- **विवेकानंद सेवा पुरस्कार** १२ जून १९९६.
- **शिरोमणी ॲवॉर्ड १९९६**
- **दिवालीबेन मेहता ॲवॉर्ड** - ८ जानेवारी १९९२
- **(GIANTS) जाएंट्स इंटरनॅशनल ॲवॉर्ड** १७ सप्टेंबर २०००

महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते सामाजिक कार्याबद्दल १७ सप्टेंबर २००० रोजी वितरित.

- **बसवश्री प्रशस्ती २००० ॲवॉर्ड**
- **नॅशनल इंटिग्रेशन ॲवॉर्ड**

  हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री (धुमला) यांच्या हस्ते १४ फेब्रुवारी १९९९ रोजी पुरस्काराने सन्मानित.
- **जनसेवा पुरस्कार** - २८ फेब्रुवारी १९९८.
- **रोटरी इंटरनॅशनल मानवसेवा पुरस्कार**

  सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश श्री. डी. पी. वाधवा यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे २१ फेब्रुवारी १९९८ रोजी भ्रष्टाचारविरोधात केलेल्या कार्याबद्दल सन्मानित.[२५]

अशाप्रकारे अण्णा हजारे यांनी सामाजिक क्षेत्रात केलेल्या विशेष उल्लेखनीय कार्याची नोंद सरकार सहित विविध संस्था संघटनांनी घेतली व त्याबद्दल त्यांना गौरवण्यात आले. यानंतरही अण्णा हजारे यांचे कार्य सुरुच असून त्याची नोंद शासन दरबारी व वेगवेगळ्या संस्था - संघटना घेत आहेत.

## ३.६ सारांश :

थोडक्यात अण्णा हजारे यांचा जीवनपरिचय एक व्यक्ती म्हणून अभ्यासण्याचा प्रयत्न आपण या प्रकरणात केला आहे. महापुरुषांच्या उदयाला कोणती सामाजिक, राजकीय परिस्थिती कारणीभूत ठरते,

जगाच्या पाठीवर कोणत्या सामाजिक व राजकीय परिस्थितीमध्ये कोणते महापुरुष जन्माला? आले त्यांनी या पृथ्वीतलावर कोणते कार्य केले? याचा अभ्यास? आपण या प्रकरणाच्या प्रस्तावनेत केला आहे.

अण्णा हजारे यांचा जन्म कोठे झाला त्यांच्या जन्माच्या प्रसंगी तत्कालीन परिस्थितीत त्यांची कौटुंबिक आर्थिक स्थिती कशी होती? कुटुंबात किती सदस्य होते याचा अभ्यास, उल्लेख कौटुंबिक स्थिती या घटकात केलेला आहे.

अण्णा हजारे यांना काहीशी समज येऊ लागली तेव्हाच बालपणीचा काळात अण्णा हजारे त्यांचे आई वडील त्यांच्या शिक्षणासाठी चिंता करत असताना त्यांच्या मामांनी त्यांना शिक्षणासाठी मुंबईला घेऊन जायचा प्रस्ताव मांडला. परवानगी देताच अण्णा हजारे यांचे मामा त्यांना मुंबईला घेउन गेले त्यामुळे त्यांचे बालपण मुंबईमध्ये गेले. मुंबईत लहानपणी त्यांच्या जीवनात काही प्रसंग आले मग तो प्रसंग पिक्चरच्या थिएटरमध्ये गुंडांशी झालेल्या मारामारीचा असेल अथवा व्यापाऱ्यांची पिळवणूक करण्याऱ्या पोलिसांशी झालेल्या संघर्षाचा असेल त्याचाही उल्लेख बालपणातील काही आठवणींचे प्रसंग या घटकात केलेला आहे.

अण्णांच्या घरातील आर्थिक परिस्थिती जेमतेम असल्यामुळे व देशसेवेची इच्छा असल्यामुळे अण्णांना भारतीय लष्करात भरती व्हावे लागले. लष्करी जीवन, सैनिकी जीवन जगत असताना अण्णा हजारे यांना वेगवेगळ्या कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागले. सैन्यातील अधिकाऱ्यांशी सैनिकांच्या निरनिराळ्या प्रश्नासंबंधी संघर्ष करावा लागला. कारण अण्णा हजारे यांना अगदी लहानपणापासूनच, बालपणापासूनच अन्यायाची चीड होती. कुणावर अन्याय होताना दिसला की अण्णा हजारे यांचे मन

पेटून उठे. तसे अन्यायाविरोधात लढण्याचे बाळकडूच त्यांना त्यांच्या आईने त्यांना बालपणीच पाजले होते. याचा अभ्यास आपण अण्णा हजारे यांचे सैनिकी जीवन या घटकात केलेला आहे.

सैन्यात असताना एक दिवस अण्णा विचारमग्न झाले. त्यांना प्रश्न पडला, की माणसे जगतात कशासाठी? जो तो सारखा पुढे पळत आहे. कोण धावे कुणाच्या पुढे? असा प्रश्न पडला आहे. स्पर्धा सुरु आहे. माणूस जन्माला येताना काहीच घेऊन येत नाही आणि जातानाही रिकाम्या हाताने जातो; मग ही स्पर्धा कशासाठी? या प्रश्नाचे उत्तर मिळत नव्हते; म्हणून अण्णा हजारे यांनी आत्मघाताचा विचार केला आणि जीवन संपवण्याचे ठरवले; परंतू दिल्लीच्या रेल्वे स्टेशनवर फेऱ्या मारत असताना बुकस्टॉलवरील एका स्वामी विवेकानंदांचे चित्र असलेल्या पुस्तकावर अण्णा हजारे यांचे लक्ष गेले. ते पुस्तक त्यांनी खरेदी केले आणि त्यांना जीवनाचे सार उमगले मानवाला जीवन प्राप्त झाले आहे ते जनसेवेसाठी, समाजसेवेसाठी. हे उत्तर मिळताच अण्णा हजारे समाजसेवेसाठी सज्ज झाले. याचा अभ्यास 'आत्मघाताचा विचार आणि समाजसेवेमागील प्रेरणा' या घटकात केलेला आहे.

अण्णांच्या संपूर्ण जीवनाचा अभ्यास केल्यानंतर अण्णांनी त्यांच्या जीवनात वेगवेगळ्या क्षेत्रांत जी समाजसेवा केली, जे कार्य केले, त्याबद्दलची नोंद सरकारने घेतली आणि त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी त्यांना वेगवेगळे पुरस्कार सरकारतर्फे प्रदान करण्यात आले. त्याचाही अभ्यास 'अण्णांच्या कार्याचा गौरव' या घटकात केला आहे.

अशा प्रकारे या प्रकरणात अण्णा हजारे यांचे जीवन एक व्यक्तिपरिचय म्हणून अभ्यासण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## संदर्भ सूची :-


१) जांभेकर ग. गं. (संपादक), आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे जीवनवृत्त व लेखसंग्रह, खंड २, पृ. ९

२) इनामदार ना. र. (संपादक), लोकहितवादी, शतपत्रे, दुसरी आवृत्ती १९६० पृ. २९५

३) कित्ता, पृ.२९९

४) मालशे स. गं., आपटे नंदा, विधवा विवाह चळवळ, १८००-१९००,१९७८ पृ.३-४

५) जांभेकर ग. गं. (संपादक), आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे जीवनवृत्त व लेखसंग्रह खंड-२ पृ. १३३

६) गिडुमल दयाराम, द लाइफ वर्क ऑफ बेहरामजी एम. मलबारी, १८८८, मुंबई पृ. क्र. १२१

७) मुंबई सरकार, द रिपोर्ट ऑफ द बोर्ड ऑफ एज्युकेशन ऑफ द बॉम्बे प्रेसिडेन्सी, १ मे १८५१ ते ३० एप्रिल १८५२, पृ. क्र. १२

८) हजारे अण्णा : माझे गाव- माझे तीर्थ, पृ. क्र. १, २.

९) हजारे अण्णा : वाट ही संघर्षाची, सिग्नेट पब्लिकेशन, पृ. क्र. १८

१०) हजारे अण्णा : माझे गाव - माझे तीर्थ, स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी प्रकाशन, राळेगणसिध्दी पृ. क्र.२

११) हजारे अण्णा : वाट ही संघर्षाची, सिग्नेट पब्लिकेशन्स, पुणे, पृ. क्र. १७, १८

१२) हजारे अण्णा : वाट ही संघर्षाची : पृ.क्र. १९, २०, सिग्नेट पब्लिकेशन, पुणे

१३) हजारे अण्णा : माझे गाव-माझे तीर्थ, स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी प्रकाशन, राळेगण सिध्दी पृ. क्र. ३,४.

१४) हजारे अण्णा : वाट ही संघर्षाची, पृ. क्र. २१, २२, २३, २४- सिग्नेट पब्लिकेशन्स, पुणे

१५) हजारे अण्णा : वाट ही संघर्षाची पृ. क्र. २५, २६- सिग्नेट पब्लिकेशन्स, पुणे

१६) कित्ताः पृ.क्र.२७, २८, २९, ३०

१७) हजारे अण्णा : वाट ही संघर्षाची, सिग्नेट पब्लिकेशन्स, पुणे, पृ. क्र. ३१, ३२.

१८) हजारे अण्णा : वाट ही संघर्षाची, सिग्नेट पब्लिकेशन्स, पुणे, पृ. क्र. ३३, ३४

१९) कित्ता:पृ. क्र. ३५, ३६

२०) कित्ता : प्र.क्र. ३७, ३८, ३९, ४०.

२१) कित्ता : प्र.क्र. ४१, ४२

२२) हजारे अण्णा : माझे गाव-माझे तीर्थ - स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी प्रकाशन, तृतीय आवृत्ती २०११, पृ. क्रं. १८, १९, २०.

२३) हजारे अण्णा : माझे गाव-माझे तीर्थ - स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी प्रकाशन, पृ. क्र. २१, २२, २३, २४.

२४) कित्ता : पृ.क्र. २५, २६, २७, २८.

२५) वेबसाइट : www.Annahazare.org